ePaper
वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827
महाईन्यूज ™
WWW.MAHAENEWS.COM | मंगळवार, दि. 11 ऑगस्ट 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!

## 1200 किमी आत शिरून युक्रेनचा रशियावर मोठा हल्ला; 12 जणांचा मृत्यू





पान 3 वरुन...

मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना ४० लाखांचा आधार!

## आंदोलकांवर पोलिसांकडून लाठीचार्ज; अश्रूधुराचा वापर

# झारखंड विद्यार्थी आंदोलन पेटले







**महाईन्यूज । रांची**

**झारखंडमधील स्पर्धा परीक्षांमधील कथित पेपरफुटी आणि गैरव्यवहाराविरोधातील विद्यार्थ्यांचे आंदोलन सोमवारी अधिक तीव्र झाले. गेल्या १६ दिवसांपासून आंदोलन करणाऱ्या हजारो विद्यार्थी आणि तरुणांनी राजधानी रांचीमध्ये एकत्र येत विधानसभेवर 'घेराव' मोर्चा काढला. विधानसभेच्या दिशेने जात असताना पोलिसांनी उभारलेले बॅरिकेड्स आंदोलकांनी ओलांडण्याचा प्रयत्न केला. यावेळी पोलिसांनी आंदोलकांना रोखण्यासाठी लाठीचार्ज केला. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी अश्रुधुराच्या नळकांड्या तसेच वॉटर कॅननचा वापर करण्यात आला.**

झारखंड लोकसेवा आयोग (जेपीएससी) आणि झारखंड स्टाफ सिलेक्शन कमिशन (जेएसएससी) यांच्या विविध सरकारी भरती परीक्षांमध्ये पेपरफुटी आणि गैरव्यवहार झाल्याचा आरोप विद्यार्थ्यांनी केला आहे. परीक्षा प्रक्रियेत सुधारणा, कथित गैरप्रकारांची चौकशी आणि दोषींवर कठोर कारवाई यांसह विविध मागण्यांसाठी विद्यार्थी आंदोलन करीत आहेत. या आंदोलनासाठी झारखंडच्या विविध जिल्ह्यांतून हजारो विद्यार्थी रेल्वे, बस आणि खासगी वाहनांमधून रांचीमध्ये दाखल झाले.

आंदोलनाची तीव्रता लक्षात घेऊन पोलिसांनी विधानसभेकडे जाणाऱ्या प्रमुख मार्गांवर बॅरिकेड्स उभारले होते. शहरातील संवेदनशील चौक आणि रस्त्यांवर मोठा पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला. बाहेरून रांचीमध्ये येणाऱ्या बस आणि वाहनांचीही तपासणी करण्यात आली. मात्र, मोठ्या संख्येने जमलेल्या आंदोलकांनी विधानसभेच्या दिशेने पुढे जाण्याचा प्रयत्न केल्याने पोलिस आणि आंदोलकांमध्ये तणाव निर्माण झाला.

दरम्यान, आंदोलन मागे घेण्यासाठी राज्य सरकारकडून आंदोलकांशी चर्चा करण्यात आली होती. सरकारने आंदोलकांच्या ९८ टक्के मागण्या मान्य केल्याचा दावा केला आहे. मात्र, आंदोलकांनी हा दावा फेटाळला आहे. आंदोलकांच्या म्हणण्यानुसार, त्यांनी १३ परीक्षांबाबत आक्षेप नोंदवला असताना सरकारने केवळ तीन परीक्षा रद्द करण्यास सहमती दर्शवली आहे. पेपरफुटी आणि परीक्षांमधील गैरव्यवहारांची सीबीआय चौकशी करावी, या मागणीवर विद्यार्थी ठाम आहेत. सरकारसोबत झालेल्या चर्चेतून तोडगा न निघाल्याने विद्यार्थ्यांनी विधानसभेवर मोर्चा काढण्याचा निर्णय घेतला.

या आंदोलनाला भाजपनेही पाठिंबा दिला आहे. भाजप नेत्यांनी मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन केले. पोलिसांनी भाजप नेते आदित्य साहू, बाबूलाल मरांडी यांच्यासह काही नेत्यांना ताब्यात घेतल्याचे वृत्त आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या आंदोलनासोबतच राजकीय वातावरणही तापले आहे.

जेपीएससी-जेएसएससी सुधारणा मंचाचे नेते रवींद्र पासवान यांनी सीबीआय चौकशीच्या मागणीवर आंदोलक ठाम असल्याचे स्पष्ट केले आहे. दरम्यान, जेपीएससीचे अध्यक्ष एल. खियांगटे यांनी २२ जुलै रोजी राजीनामा दिला होता. मात्र, त्यानंतरही विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरूच आहे. पेपरफुटी आणि भरती प्रक्रियेतील कथित गैरव्यवहारांवर ठोस कारवाई होईपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याची भूमिका आंदोलकांनी घेतली आहे.

### विधानभवनाच्या दिशेने मोर्चा

झारखंड लोकसेवा आयोगाच्या परीक्षेसह इतर सरकारी परीक्षांमध्ये पेपरफुटी झाल्याचा गंभीर आरोप करत गेल्या काही दिवसांपासून आंदोलन केले जात आहे. परीक्षा पद्धतीत सुधारणा करण्यासह विविध मागण्यांसाठी विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. या आंदोलनाचा भाग म्हणून आज हजारो विद्यार्थ्यांनी विधानभवनाच्या दिशेने मोर्चा काढला आहे. रांचीमधील कायदा आणि सुव्यवस्था विचारात घेता पोलिसांनी अनेक संवेदनशील ठिकाणी बॅरिकेड्स उभारले आहेत. तसेच, महत्वाचे रस्ते, चौकात मोठा पोलिस बंदोबस्तही तैनात करण्यात आला आहे.

### हजारो विद्यार्थी, तरुण सहभागी

मार्चमध्ये सहभागी होण्यासाठी झारखंडमधून हजारो विद्यार्थी राजधानी रांचीमध्ये दाखल झाले आहेत. दुसरीकडे भाजपा नेत्यांनी मुख्यमंत्र्यांच्या निवासस्थानासमोर ठिय्या आंदोलन सुरु केल्यानंतर काही नेत्यांनी पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. झारखंड लोकसेवा आयोग आणि झारखंड स्टाफ सिलेक्शन परीक्षांमध्ये घोटाळा आणि पेपरफुटीप्रकरणी गेल्या काही दिवसांपासून विद्यार्थी आंदोलन करत आहेत. सरकारकडून आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न करण्यात तसेच, चर्चा करण्यात आली मात्र, चर्चा निष्फळ ठरल्याने विद्यार्थ्यांनी आज 'विधानसभा घेराव' मार्च काढला होता.

### भाजपा नेत्यांना घेतलं ताब्यात

आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर झारखंडच्या विविध जिल्ह्यातून हजारो तरुण, विद्यार्थी ट्रेन, बस आणि इतर मार्गांनी राजधानी रांचीमध्ये दाखल झाले आहेत. पोलिसांकडून बस, वाहनांची सीमावर्ती भाग आणि प्रमुख रस्ते, महामार्गांवर कसून तपासणी केली जात आहे. मोठ्या संख्येने आंदोलकांनी विधानभवनाच्या दिशेने मार्च करण्यास सुरुवात केली आहे. या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भाजपा नेत्यांनी देखील मुख्यमंत्री हेमंत सोरेन यांच्या निवासस्थानाबाहेर ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. पीटीआयने दिलेल्या वृत्तानुसार, पोलिसांनी भाजपा नेते आदित्य साहू, बाबूलाल मरांडी यांच्यासह इतर नेत्यांना ताब्यात घेतलं आहे.

# चाकण-तळेगावची वाहतूक होणार सुसाट!

## पुणे-नाशिक महामार्गाला चार पर्यायी बाह्यवळण रस्त्यांची जोड; १०० कोटींचा निधी

**महाईन्यूज । पुणे**

**चाकण आणि तळेगाव औद्योगिक परिसरातील वाढती वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने (पीएमआरडीए) महत्त्वाची पावले उचलली आहेत. पुणे-नाशिक महामार्गावरील वाहतुकीचा ताण कमी करण्यासाठी चार पर्यायी बाह्यवळण रस्ते विकसित करण्यात येणार असून, त्यासाठी भूसंपादन प्रक्रियेला गती देण्यात आली आहे. यासोबतच प्रमुख जिल्हा मार्गांच्या विकासाची कामेही प्रगतिपथावर आहेत.**




या रस्ते प्रकल्पांमुळे चाकण, तळेगाव आणि परिसरातील औद्योगिक वाहतुकीला मोठी चालना मिळण्याची अपेक्षा आहे. विशेषतः अवजड वाहनांची वाहतूक मुख्य चौकांमधून वळविल्याने चाकण चौक, तळेगाव चौक आणि आंबेठाण चौकातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

'पीएमआरडीए'कडून चाकण आणि तळेगाव परिसरासाठी पूर्व बाह्यवळण मार्ग प्रस्तावित करण्यात आला आहे.

त्याचाच भाग म्हणून चार महत्त्वाचे रस्ते विकसित केले जाणार आहेत. तळेगाव-चाकण महामार्गावरील हिंगणे चौक ते चाकण औद्योगिक क्षेत्र टप्पा तीनमधील खराबवाडीला जोडणारा रस्ता तयार केला जाणार आहे. ९०० मीटर लांबीचा आणि ३० मीटर रुंद असलेला हा रस्ता हिंगणे चौकाला फोक्सवॅगन कंपनी परिसराशी जोडणार आहे.

या मार्गामुळे तळेगाव तसेच चाकण एमआयडीसी टप्पा दोन आणि तीनमधून पुणे व नाशिकच्या दिशेने जाणारी वाहतूक थेट पुणे-नाशिक महामार्गाशी जोडली जाणार आहे. परिणामी तळेगाव चौक आणि चाकण परिसरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होणार आहे.

नाणेकरवाडीतील सॅनी कंपनी ते समृद्धी सीएनजी पंपादरम्यान १.२ किलोमीटर लांबीचा आणि १५ मीटर रुंद रस्ता विकसित केला जाणार आहे. हा मार्ग तळेगाव तसेच चाकण एमआयडीसी टप्पा दोन आणि तीनला पुणे-नाशिक महामार्गाशी जोडणार आहे. त्यामुळे चाकणच्या मुख्य चौकावरील वाहतुकीचा ताण कमी होण्याची शक्यता आहे. मेदनकरवाडीतील बंगला वस्ती चौक ते रासे फाटा असा २.५ किलोमीटर लांबीचा आणि ३५ मीटर रुंद रस्ता प्रस्तावित आहे. हा मार्ग पुणे, तळेगाव आणि चाकण एमआयडीसी टप्पा दोन व तीनला पुणे-नाशिक महामार्गावरून शिक्रापूर राज्य मार्गावरील रासे फाट्याशी जोडणार आहे.

चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला गती देण्यासाठी 'पीएमआरडीए'ने प्रमुख जिल्हा मार्गांच्या विकासासाठी १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद केली आहे. या मार्गांची कामे सध्या प्रगतिपथावर आहेत. याशिवाय चार बाह्यवळण मार्गांसाठी भूसंपादन प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. हे रस्ते पूर्ण झाल्यानंतर चाकण-तळेगाव औद्योगिक पट्ट्यातील वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम होण्यासोबतच पुणे-नाशिक मार्गावरील प्रवासाचा वेळही कमी होण्यास मदत होणार आहे.

### औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला गती

"चाकण आणि तळेगाव औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला गती देण्यासाठी प्रमुख जिल्हा मार्गांच्या विकासाचे काम हाती घेण्यात आले आहे. यासाठी १०० कोटी रुपयांच्या निधीची तरतूद करण्यात आली असून, ही कामे प्रगतिपथावर आहेत. याचबरोबर चार बाह्यवळण मार्ग प्रस्तावित असून, त्यासाठी भूसंपादन प्रक्रिया सध्या सुरू आहे. यामुळे भविष्यात औद्योगिक क्षेत्रातील वाहतुकीला गती मिळेल," अशी माहिती पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे कार्यकारी अभियंता शिवकुमार कुपल यांनी दिली.

# 'पिंक ई-रिक्षा'साठी अडथळ्यांचीच वाट; महिलांकडून प्रतिसाद नाही

**महाईन्यूज । पुणे**

**येथे सावकाराविरुद्ध तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या महिलेला सावकाराने पोलिसांसमोरच धमकी दिल्याचा प्रकार घडला आहे. या वेळी पोलीस ठाण्यात गोंधळही झाला. या प्रकरणी प्रमोद उर्फ परमेश्वर मोहन मार्कड (रा. उरुळी कांचन, ता. हवेली) याच्याविरुद्ध सावकारी आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.**



### पोलिसांसमोरच गोंधळ; भूमिकेवर प्रश्नचिन्ह

महिला तक्रार देण्यासाठी पोलीस ठाण्यात आली असताना तेथे अधिकारी आणि कर्मचारी उपस्थित होते. त्यांच्यासमोरच गोंधळ झाल्याने पोलिसांनी परिस्थिती वेळीच नियंत्रणात का आणली नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे. तक्रार करण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या महिलेलाच तेथे धमकी देण्यात आल्याने या प्रकरणात पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्न उपस्थित केले जात आहेत. या घटनेमुळे पोलीस ठाण्यातच महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला असून, संबंधितांवर तातडीने कारवाई करण्याची मागणी होत आहे.

याबाबत ३५ वर्षीय महिलेने पोलिसांत तक्रार दिली आहे. संबंधित महिला घरोघरी धुणी-भांडी करण्याचे काम करते. तिने प्रमोद याच्याकडून ८ फेब्रुवारी २०२५ रोजी ३ लाख १४ हजार रुपये व्याजाने घेतले होते. त्यानंतर ९ ऑगस्ट २०२६ पर्यंत प्रमोदने तिच्याकडून वेळोवेळी तब्बल १० लाख ८४ हजार रुपये वसूल केल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

इतकी रक्कम दिल्यानंतरही तो महिलेकडे आणखी पैशांची मागणी करत होता. 'तू मला एकटी भेट, तुला लागतील तर अजून पैसे देतो,' असे सांगून तो महिलेला एकटीला भेटण्यासाठी बोलवत होता. तसेच, तो तिचा सतत पाठलाग करत असल्याचेही तक्रारीत नमूद करण्यात आले आहे.

या प्रकाराला कंटाळून महिला प्रमोदविरुद्ध तक्रार देण्यासाठी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात गेली. मात्र, तेथेही तिला धमकी देण्यात आली आणि पोलिसांसमोरच गोंधळ झाल्याचा आरोप आहे.

पोलिसांनी या प्रकरणी प्रमोद उर्फ परमेश्वर मार्कड याच्याविरुद्ध सावकारी आणि विनयभंगाचा गुन्हा दाखल केला आहे. या घटनेत परस्परविरोधी तक्रारीवरून संबंधित महिलेविरुद्धही गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणामुळे परिसरात खळबळ उडाली असून, पोलिसांनी तक्रारीची गंभीर दखल घेत तपास सुरू केला आहे. महिलेने दिलेल्या तक्रारीतील आर्थिक व्यवहार तसेच धमकी आणि पाठलागाच्या आरोपांची पडताळणी केली जात आहे. दरम्यान, परस्परविरोधी तक्रारीमुळे प्रकरणाला वेगळे वळण मिळाले असून, दोन्ही बाजूंच्या आरोपांची चौकशी करण्यात येत आहे. तपासानंतर या प्रकरणातील नेमके तथ्य स्पष्ट होणार आहे.

# मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबीयांना ४० लाखांचा आधार!

## पाल्यांचे शिक्षण कंपनी करणार; पात्र वारसाला नोकरी, आरोग्य विम्याचेही संरक्षण

**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**मोशी कचरा डेपो परिसरातील ८ जुलै रोजी झालेल्या भीषण दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना संबंधित कंपनीकडून मोठा दिलासा देण्यात आला आहे. प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना ४० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा कंपनीच्या वतीने करण्यात आली. तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी, कुटुंबातील पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णयही जाहीर करण्यात आला.**




### मृतांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा

कंपनीकडून प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना ४० लाखांची मदत जाहीर. यासोबतच पाल्यांचे शिक्षण, पात्र वारसाला नोकरी आणि आरोग्य विम्याचे संरक्षण देण्यात येणार.

### मृतांच्या कुटुंबांना कंपनीचा हातभार

मोशी दुर्घटनेत जीव गमावलेल्या ९ कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना कंपनीकडून प्रत्येकी ४० लाख रुपये देण्यात येणार आहेत. याशिवाय मुलांच्या शिक्षणाचा खर्च, कुटुंबातील पात्र व्यक्तीला रोजगार आणि आरोग्य विम्याची सुविधा दिली जाणार आहे.

### महापालिकेचीही १० लाखांची मदत

दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर कंपनीनेही ४० लाखांची मदत जाहीर केली आहे.

या निर्णयाची माहिती देण्यासाठी सोमवारी पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, ‘क’ क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, विधी समिती सभापती सुजाता बोराटे, नगरसेविका सारिका गायकवाड, कंपनीचे एचआर प्रतिनिधी तसेच मृत कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते.

मोशी कचरा डेपो परिसरात ८ जुलै रोजी कचऱ्याचा मोठा ढिगारा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळला होता. या दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू, तर १४ जण जखमी झाले होते. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या कामगारांचा शोध घेण्यासाठी विविध बचाव पथकांनी युद्धपातळीवर मोहीम राबवली. तब्बल ८४ तासांच्या अथक प्रयत्नांनंतर बचावकार्य पूर्ण करण्यात आले.

दुर्घटनेनंतर मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना आर्थिक मदत मिळावी आणि त्यांच्या भविष्यासाठी ठोस उपाययोजना कराव्यात, अशी मागणी करण्यात आली होती. त्यानुसार पिंपरी-चिंचवड महापालिकेने मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यानंतर आता कंपनीने प्रत्येकी ४० लाख रुपयांची मदत जाहीर केल्याने कुटुंबीयांना आर्थिक आधार मिळणार आहे.

कंपनीचे मदत पॅकेज केवळ आर्थिक मदतीपुरते मर्यादित नसून मृत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाचा खर्च, पात्र वारसाला रोजगार आणि आरोग्य विमा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. कुटुंबातील कर्त्या व्यक्तीच्या निधनामुळे निर्माण झालेली आर्थिक पोकळी भरून काढण्यासाठी या उपाययोजनांचा मोठा आधार मिळणार आहे. पत्रकार परिषदेत मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या भवितव्याबाबतही सविस्तर चर्चा करण्यात आली.

कंपनीकडून जाहीर करण्यात आलेली ४० लाखांची मदत आणि शिक्षण, रोजगार व आरोग्य विम्याची हमी यामुळे मोशी दुर्घटनेतील मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना संकटाच्या काळात दिलासा मिळणार आहे.

# पिंपरी-चिंचवड महापालिका डीपीला नागरिकांचा जोरदार विरोध




**महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड**

**पिंपरी-चिंचवड महापालिकेने प्रसिद्ध केलेल्या प्रारूप सुधारित विकास आराखड्यावर (डीपी) नागरिकांनी मोठ्या प्रमाणात हरकती नोंदविल्या आहेत. सुधारित डीपीवर तब्बल ५६ हजार ७७९ हरकती दाखल झाल्या असून, त्यापैकी १७ आरक्षणे आणि प्रस्तावांवरच ३७ हजार ४७९ हरकती आल्या आहेत. रस्ते रुंदीकरण, कत्तलखाना, दफनभूमी, सार्वजनिक सुविधांची आरक्षणे तसेच पूररेषेशी संबंधित प्रस्तावांना सर्वाधिक विरोध झाल्याचे आकडेवारीवरून स्पष्ट झाले आहे.**

### डीपीवर हरकतींचा विक्रम

पिंपरी-चिंचवडच्या सुधारित विकास आराखड्यावर तब्बल ५६,७७९ हरकती दाखल झाल्या आहेत. यापैकी १७ आरक्षणे व प्रस्तावांवर ३७,४७९ आक्षेप नोंदविण्यात आले आहेत.

### मोशी कत्तलखान्यालाही विरोध

मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षणावर २,७५४ हरकती दाखल झाल्या आहेत. सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणांनाही नागरिकांनी मोठ्या प्रमाणात आक्षेप घेतला आहे.

पिंपरी-चिंचवड नवनगर विकास प्राधिकरणाकडून महापालिकेकडे वर्ग झालेल्या क्षेत्राचा समावेश करून सुधारित डीपी तयार करण्यात आला आहे. या आराखड्यावर १५ मे २०२५ ते १४ जुलै २०२५ या ६० दिवसांच्या कालावधीत नागरिकांकडून हरकती मागविण्यात आल्या होत्या. या कालावधीत शहराच्या विविध भागांतून मोठ्या प्रमाणात आक्षेप दाखल झाले.

पिंपरीतील म्युनिसिपल पर्पज, पोलिस स्टेशन आणि बस टर्मिनस या आरक्षणांवर एकत्रित ५ हजार ८३८ हरकती आल्या आहेत. त्यानंतर तळवडे येथील घरजाई माता मंदिराजवळील २४ मीटर रस्त्याच्या प्रस्तावावर ४ हजार ४१८, तर चिखलीतील दफनभूमी आरक्षणावर ४ हजार ३१८ हरकती दाखल झाल्या आहेत. सांगवीतील दफनभूमी आरक्षणालाही मोठा विरोध असून, त्यावर ४ हजार १२४ हरकती नोंदविण्यात आल्या आहेत.

मोशी येथील प्रस्तावित कत्तलखाना आरक्षणावर २ हजार ७५४ हरकती, तर किवळे येथील दफनभूमी आरक्षणावर २ हजार ४३५ हरकती आल्या आहेत. चिखलीतील विविध सार्वजनिक सुविधांच्या आरक्षणांनाही नागरिकांचा विरोध असल्याचे दिसून येते.

शहरातील रस्ते रुंदीकरणाच्या प्रस्तावांवरही मोठ्या प्रमाणात आक्षेप नोंदविण्यात आले आहेत. थेरगाव येथील २४ मीटर रस्त्याच्या प्रस्तावावर २ हजार ९३९, तर पिंपरीतील प्रस्तावित रस्त्यावर ८००, चिंचवडमधील २४ मीटर रस्त्यावर ७०० आणि वाकडमधील १८ व २४ मीटर रस्त्यांच्या प्रस्तावावर ४९३ हरकती दाखल झाल्या आहेत.

दरम्यान, प्रारूप सुधारित डीपीवरील हरकतींच्या सुनावणीला तब्बल वर्षभराच्या विलंबानंतर ३ ऑगस्टपासून सुरुवात झाली आहे. सुनावणी समितीसमोर हरकतदारांना आपली बाजू मांडण्याची संधी दिली जात आहे. सर्व हरकतींचा विचार करून समिती अंतिम निर्णय घेणार आहे. त्यामुळे रस्ते, कत्तलखाना, दफनभूमी, सार्वजनिक सुविधा आणि पूररेषेशी संबंधित आरक्षणांमध्ये बदल होणार का, याकडे शहरवासीयांचे लक्ष लागले आहे.



## भूमिका

**जगातील राहण्यायोग्य शहरांची यादी म्हणजे केवळ उंच इमारती, भव्य रस्ते, मोठी पर्यटनस्थळे किंवा आर्थिक समृद्धीचे मोजमाप नव्हे. शहरात राहणाऱ्या सामान्य नागरिकाचे दैनंदिन जीवन किती सुसह्य, सुरक्षित आणि सन्मानजनक आहे, यावर त्या शहराची खरी गुणवत्ता ठरते. याच निकषावर जपानमधील ओसाका आणि तोक्यो या शहरांनी जगाचे लक्ष वेधून घेतले आहे.**

# राहण्यायोग्य शहरांसाठी जपानचा आदर्श



इकॉनॉमिस्ट इंटेलिजन्स युनिटच्या राहण्यायोग्य शहरांच्या क्रमवारीत ओसाका सातव्या, तर तोक्यो दहाव्या क्रमांकावर आहे. पहिल्या दहामध्ये दोन शहरे असलेला जपान हा एकमेव आशियाई देश ठरला आहे. जपानच्या या यशामागे केवळ आर्थिक ताकद नाही, तर शहर नियोजनातील दूरदृष्टी आहे. शहर हे केवळ वाहनांसाठी नसून माणसांसाठी असावे, हा दृष्टिकोन जपानने स्वीकारला आहे.

नागरिकांना खासगी वाहनाशिवाय कामावर जाता यावे, पायी चालता यावे, सायकल चालवता यावी आणि वृद्ध, दिव्यांग तसेच लहान मुलांसह प्रवास करणाऱ्या कुटुंबांनाही सार्वजनिक जागा सहज वापरता याव्यात, याला प्राधान्य दिले जाते.

जपानमधील 'शोतेंगाई' ही संकल्पना याचे उत्तम उदाहरण आहे. छत असलेल्या बाजाररस्त्यांवर भाजीपाला, कॅफे, रेस्टॉरंट, दवाखाने आणि इतर दैनंदिन गरजेच्या वस्तू सहज उपलब्ध होतात. त्यामुळे नागरिकांना प्रत्येक छोट्या कामासाठी लांबचा प्रवास करावा लागत नाही. आपल्या शहरांमध्ये मात्र किराणा दुकान, शाळा, रुग्णालय किंवा बाजार यासाठीही वाहन काढावे लागते. परिणामी वाहतूककोंडी, प्रदूषण आणि वेळेचा अपव्यय वाढतो.

जपानने रस्त्यांची रचना करताना वाहनांपेक्षा माणसाला केंद्रस्थानी ठेवले आहे. अरुंद रस्त्यांवरही छोट्या वाहनांचा वापर केला जातो. पादचारी, सायकलस्वार आणि वाहनचालक यांच्यात समतोल राखण्याचा प्रयत्न केला जातो. उत्कृष्ट सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असल्यामुळे वैयक्तिक वाहनांवरील अवलंबित्व कमी झाले आहे.

दिव्यांग आणि वृद्धांसाठीही जपानने महत्त्वपूर्ण पावले उचलली. २००६ मधील 'बॅरिअर फ्री' कायद्यामुळे अनेक रेल्वेस्थानकांवर लिफ्टची सुविधा उपलब्ध झाली. म्हणजे विकासाचा अर्थ केवळ वेग नव्हे, तर सर्वसमावेशक सुविधा असा जपानचा दृष्टिकोन आहे.

आधुनिकतेचा स्वीकार करतानाच जुन्या वारशाचे जतन करणे ही जपानची आणखी एक वैशिष्ट्यपूर्ण बाब आहे. बुलेट ट्रेनसारख्या अत्याधुनिक सुविधा स्वीकारतानाही शेकडो वर्षे जुनी झाडे आणि पारंपरिक वास्तू जपल्या जातात. कयाशिमा स्थानकातील सुमारे ७०० वर्षे जुने कापुराचे झाड याचे प्रतीक आहे.

भारतीय शहरांसाठी यात मोठा धडा आहे. शहर सुंदर दिसण्यापेक्षा ते नागरिकांना जगण्यासाठी सोयीचे असणे अधिक महत्त्वाचे आहे. पादचारी मार्ग, सार्वजनिक वाहतूक, सुरक्षित रस्ते, दिव्यांगांसाठी सुविधा, जवळच्या अंतरावर दैनंदिन गरजा आणि पर्यावरणाचे संरक्षण यांना शहर नियोजनाच्या केंद्रस्थानी आणावे लागेल. जपानने दाखवून दिले आहे की राहण्यायोग्य शहर घडवण्यासाठी केवळ पैसा नव्हे, तर माणूसकेंद्री विचार, शिस्त आणि दीर्घकालीन नियोजन आवश्यक असते.

## प्रासंगिक »

### अहंकाराने पराभव

**गंधर्वकुळातील गुत्तिलकुमार नावाचा एक कुशल वीणावादक होता. त्याच्या अप्रतिम वी-णावादनाची कीर्ती संपूर्ण वाराणसीत पसरली होती. त्याच काळात उज्जयिनीमध्ये मुसिल नावाचा एक गंधर्व राहत होता. एकदा त्याला राजदरबारात वीणा वाजवण्यासाठी बोलावले.**

मात्र त्याचे वादन राजाला आणि दरबाऱ्यांना अजिबात आवडले नाही. आपली कला सुधारण्यासाठी मुसिलने गुत्तिलकुमारांकडे जाऊन त्यांचे शिष्यत्व स्वीकारले. गुत्तिलनेही त्याला मनापासून वीणावादन शिकवले. शिक्षण पूर्ण झाल्यावर मुसिलने राजदरबारात नोकरी मिळवण्याची इच्छा व्यक्त केली. गुत्तिलने मोठ्या मनाने राजाकडे त्याची शिफारस केली.

मुसिलला वाटले की आपण आता गुरू-इतकेच श्रेष्ठ कलाकार झालो आहोत. त्याने गुरूशी स्पर्धा करण्याचा हट्ट धरला. राजाने दोघांची वीणावादनाची स्पर्धा आयोजित केली. स्पर्धेत गुत्तिलने अशा काही अवघड ताना वाजवल्या, ज्या त्याने मुसिलला शिकवल्याच नव्हत्या. मुसिलला त्या ताना वाजवता आल्या नाहीत. त्यामुळे त्याचा पराभव झाला आणि त्याला आपली चूक समजली.

- तात्पर्य : गुरुलाच अहंकाराने आव्हान देणे कधीच योग्य ठरत नाही.

'यूपीआय' ही भारताच्या डिजिटल अर्थव्यवस्थेतील महत्त्वाची क्रांती ठरली आहे. रोख पैशाविना क्षणार्धात व्यवहार करण्याची सुविधा सामान्यांच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनली.

# मोफत मिजासीला अखेर मोजावीच लागते किंमत




मात्र, एखादी सुविधा वर्षानुवर्षे मोफत ठेवून तिचा गवगवा करणे आणि नंतर तिच्यावर शुल्क आकारण्याची तयारी करणे, हे सरकारच्या धोरणातील विसंगती अधोरेखित करणारे आहे.

यूपीआय व्यवहारांची संख्या आणि त्यातून होणारी उलाढाल प्रचंड वाढली आहे. त्यामागे अत्याधुनिक तंत्रज्ञान, बँका, वित्तसंस्था, खासगी कंपन्या आणि प्रचंड डेटा व्यवस्थापनाची यंत्रणा कार्यरत आहे. ही व्यवस्था उभारण्यासाठी आणि चालवण्यासाठी मोठा खर्च येतो. त्यामुळे कायमस्वरूपी मोफत व्यवहारांची अपेक्षा वास्तववादी नाही. सरकारने सुरुवातीपासूनच या खर्चाचा आणि भविष्यातील आर्थिक भाराचा विचार करणे आवश्यक होते.

आता दोन हजार रुपयांपेक्षा अधिक व्यवहारांवर शुल्क आकारण्याची चर्चा होत असेल, तर त्यातील व्यवहार्यतेचे प्रश्नही उपस्थित होतात. एखाद्याला दहा हजार रुपये द्यायचे असतील, तर दोन हजारांच्या पाच स्वतंत्र व्यवहारांतून शुल्क टाळण्याचा मार्ग सहज उपलब्ध राहू शकतो. अशा परिस्थितीत प्रस्तावित मर्यादा कितपत प्रभावी ठरेल, हा प्रश्न आहे.

शुल्क व्यापाऱ्यांकडून आकारले जाणार असल्याचे सांगून ग्राहकांवरील भार टाळता येणार नाही. व्यापारी हा खर्च स्वतःच्या खिशातून भरेल, अशी अपेक्षा करणे अवास्तव आहे. अखेरीस त्याचा भार वस्तू किंवा सेवांच्या किमतीतून ग्राहकांवरच पडण्याची शक्यता आहे. शिवाय शुल्क वाढल्यास काही व्यवहार पुन्हा रोख पैशांकडे वळण्याचा धोका आहे. मग 'कॅशलेस' अर्थव्यवस्थेच्या उद्दिष्टाचे काय?

या संपूर्ण चर्चेत आणखी एक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्राहकांचा डेटा. डिजिटल व्यवहारांच्या माध्यमातून निर्माण होणारी प्रचंड माहिती ही आजच्या अर्थव्यवस्थेतील मौल्यवान संपत्ती आहे. तिच्या सुरक्षिततेबरोबरच तिचा वापर कोण करणार, त्यातून कोणाला आर्थिक फायदा होणार आणि ग्राहकांच्या हिताचे संरक्षण कसे होणार, याबाबत स्पष्ट धोरण आवश्यक आहे.

यूपीआयच्या शुल्कामागे आंतरराष्ट्रीय दबाव, विशेषतः अमेरिकन कार्ड कंपन्यांचे हितसंबंध असल्याच्या चर्चाही होत आहेत. अशा वेळी सरकारने पारदर्शकपणे भूमिका स्पष्ट करणे गरजेचे आहे. यूपीआय ही भारताची यशोगाथा आहे; मात्र तिचे यश केवळ घोषणांमध्ये नव्हे, तर दीर्घकालीन आणि न्याय्य धोरणात दिसले पाहिजे. मोफत सुविधा देणे सोपे असते; पण त्याची किंमत कोण आणि किती काळ मोजणार, याचे उत्तर आधीच शोधणे हेच सुज्ञ शासनाचे लक्षण आहे.

## ।। अभंगवाणी ।।



तेलनीशीं रुसला वेडा ।
रागें कोरडें खातो भिडा ॥१॥

आपुलें हित आपण पाही ।
संकोच तो न धरी कांहीं ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

**महाईन्यूज** हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
**मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक.** (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गैरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

# कुंभमेळ्याच्या नावाखाली शेकडो कोटींचा गंडा?

## बनावट वर्क ऑर्डर प्रकरणात ‘जामनेर कनेक्शन’; मंत्री गिरीश महाजनांकडे तक्रार

**महाईन्यूज । नाशिक**

**नाशिक येथे होणाऱ्या आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या नावाखाली राज्यातील ठेकेदारांची कोट्यवधी रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. कुंभमेळ्याच्या कामांसाठी कोणतेही ऑफलाइन टेंडर काढलेले नसतानाही नाशिक महापालिका आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम आणि कुंभमेळा आयुक्त श्री. सिंग यांच्या नावाने बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांकडून पैसे उकळण्यात आल्याचा आरोप आहे. या बनावट आदेशांद्वारे तब्बल ४०० ते ५०० कोटी रुपयांच्या कामांचे वाटप केल्याचा दावा करण्यात आला आहे.**



फसवणूक झाल्याचा आरोप केलेल्या काही ठेकेदारांनी राज्याचे ग्रामविकास मंत्री गिरीश महाजन यांची भेट घेऊन तक्रार केली. त्यानंतर या प्रकरणातील कथित ‘जामनेर कनेक्शन’ समोर आले असून, महाजन यांनी संबंधित पोलीस व प्रशासकीय यंत्रणांना तातडीने कारवाई करण्याच्या सूचना दिल्या.

गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिलेल्या माहितीनुसार, नाशिक कुंभमेळ्याच्या नावाने जामनेर तालुक्यातील दोन, जळगावमधील एक आणि धुळ्याशी संबंधित एका व्यक्तीने बनावट वर्क ऑर्डर तयार करून ठेकेदारांना दिल्याची माहिती समोर आली आहे. या माध्यमातून ठेकेदारांकडून पैसे घेतल्याचेही तक्रारदारांनी सांगितल्याचे महाजन यांनी स्पष्ट केले.

मात्र, नेमकी किती रक्कम कोणाकडून घेण्यात आली, याबाबत ठेकेदार अद्याप स्पष्टपणे बोलण्यास तयार नसल्याचे त्यांनी सांगितले. पैसे परत देण्याचे आश्वासन देण्यात आले होते; मात्र पैसे परत न मिळाल्याने संबंधित ठेकेदारांनी अखेर आपल्याकडे तक्रार केली आणि बनावट वर्क ऑर्डरही सादर केल्याचे महाजन यांनी पत्रकार परिषदेत सांगितले.

या कथित फसवणुकीत ठेकेदारांना कोट्यवधी रुपयांच्या कामांच्या बनावट वर्क ऑर्डर देण्यात आल्याचा आरोप आहे. काही प्रकरणांत ठेकेदारांकडून रोख रक्कम तसेच धनादेश स्वीकारण्यात आल्याचेही समोर आले आहे. विशेष म्हणजे, या वर्क ऑर्डरवर शासनाच्या नियमानुसार आवश्यक असलेला क्यूआर कोड नसल्याचे काही ठेकेदारांच्या निदर्शनास आले. त्यामुळे त्यांना या कागदपत्रांबाबत संशय निर्माण झाला. त्यानंतर त्यांनी संबंधित यंत्रणांकडे चौकशी केली असता कथित बनावटगिरीचा प्रकार उघडकीस आला.

### कुंभमेळ्याचे एकही ऑफलाइन टेंडर नाही

या प्रकरणाचे गांभीर्य लक्षात घेता, गिरीश महाजन यांनी महत्त्वाचा खुलासा केला. कुंभमेळ्याच्या कामांसाठी शासनाने एकही ऑफलाइन टेंडर काढलेले नसून, सर्व निविदा प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने पार पडली आहे. तसेच नुकतीच पात्र ठेकेदारांची अधिकृत यादीही प्रसिद्ध करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. या प्रकरणाबाबत मुख्यमंत्री आणि त्यांच्या सचिवांशी चर्चा झाल्याची माहितीही महाजन यांनी दिली. कुंभमेळ्याच्या नावाने अशा किती बनावट वर्क ऑर्डर तयार करून बाजारात फिरवल्या जात आहेत, याची चौकशी सुरू करण्यात आली आहे.

### पोलिसांना कारवाईचे आदेश

कुंभमेळ्याच्या नावाने बनावट कागदपत्रे तयार करून ठेकेदारांची आर्थिक फसवणूक करणाऱ्यांविरुद्ध कठोर पोलीस कारवाई करण्याच्या सूचना देण्यात आल्याचे महाजन यांनी सांगितले. त्यामुळे आता या कथित रॅकेटमागील सूत्रधार कोण, बनावट वर्क ऑर्डर किती ठेकेदारांना देण्यात आल्या आणि या माध्यमातून किती रक्कम उकळण्यात आली, याचा तपास महत्त्वाचा ठरणार आहे. दरम्यान, या प्रकरणातील आरोपांची अधिकृत चौकशी झाल्यानंतरच फसवणुकीची नेमकी व्याप्ती आणि संबंधित व्यक्तींची भूमिका स्पष्ट होणार आहे.

# बावनकुळे, तू बावनकुळे तर आम्ही शहान्नवकुळी – जरांगे-पाटील

**महाईन्यूज । मुंबई**

**मराठ्यांच्या लेकरांच्या भवितव्याशी खेळू देणार नाही असे सांगत मराठ्यांच्या नोंदींना हात लावाल तर सरकारला भारी पडेल असा इशारा मराठा आंदोलक मनोज जरांगे- पाटील यांनी दिला. मराठा आरक्षणावर जनजागृती करण्यासाठी जरांगे सांगली दौऱ्यावर आहेत. काल रात्री आटपाडी येथे जाहीर सभा झाली यावेळी ते बोलत होते. ते म्हणाले, मराठा समाजाच्या नोंदी रद्द करण्याचा प्रयत्न सुरू आहेत.**



महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर थेट निशाणा साधताना, ‘बावनकुळे, तू बावनकुळे आहेस; आम्ही शहान्नवकुळी मराठे आहोत. मराठ्यांच्या लेकरांच्या भवितव्याशी खेळाल तर मराठ्यांचा दरारा काय असतो, हे दाखवून देऊ,’ असा इशारा त्यांनी दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील सरकारलाही त्यांनी धारेवर धरले. मराठा-कुणबी नोंदी, कुणबी प्रमाणपत्रे, ओबीसीतून आरक्षण, शिक्षण-नोकरीतील संधी आणि विविध शासकीय योजनांचा लाभ या प्रश्नांवर सरकारने स्पष्ट भूमिका घ्यावी, अशी मागणी त्यांनी केली.

भवानी विद्यालयाच्या पटांगणावर झालेल्या सभेला मराठा समाजबांधवांची मोठी गर्दी झाली होती. तरुणांपासून ज्येष्ठांपर्यंत समाजबांधवांची उपस्थिती आणि ‘एक मराठा, लाख मराठा’च्या घोषणांनी सभेचे मैदान अक्षरशः दणाणून गेले.

‘महसूल विभाग तुमच्याकडे आहे म्हणून मराठ्यांच्या नोंदींशी खेळण्याचा अधिकार मिळत नाही. मराठ्यांच्या नोंदी रद्द करण्याचा प्रयत्न का सुरू आहे? कोणाच्या आदेशाने हा प्रकार सुरू आहे?’ असा सवाल जरांगे-पाटील यांनी केला.

‘मराठ्यांच्या हक्काच्या नोंदींवर हात टाकला, तर हा डाव उधळून लावू. समाजात गैरसमज निर्माण करून आंदोलन कमजोर करण्याचे राजकारण आता चालणार नाही,’ असा इशाराही त्यांनी दिला.

### ...तर गाठ आमच्याशी

महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यावर थेट निशाणा साधत मनोज जरांगे-पाटील यांनी मराठा समाजाच्या हक्काच्या नोंदी, कुणबी प्रमाणपत्रे आणि आरक्षणाच्या प्रश्नावर आक्रमक भूमिका मांडली. “मराठ्यांच्या लेकरांच्या भवितव्याशी खेळाल, तर मराठ्यांचा दरारा काय असतो, हे दाखवून देऊ,” असा इशारा त्यांनी दिला. “मराठ्यांच्या हक्काच्या नोंदींवर हात टाकला, तर हा डाव उधळून लावू,” असेही जरांगे-पाटील यांनी स्पष्ट केले.

# ‘वंदे मातरम्’वरून दक्षिणेत वेगळी भूमिका?

## तामिळनाडूने केला राज्यगीतालाच शासकीय कार्यक्रमांच्या सुरुवातीला स्थान देण्याचा ठराव

**महाईन्यूज । नवी दिल्ली**

**केंद्र सरकारने २८ जानेवारी २०२६ रोजी ‘वंदे मातरम्’च्या गायनाबाबत नवा प्रोटोकॉल जारी केला. त्यानुसार, राष्ट्रीय गीताची अधिकृत सहा कडव्यांची पूर्ण आवृत्ती गायली किंवा वाजवली जाईल. या आवृत्तीचा कालावधी सुमारे ३ मिनिटे १० सेकंद आहे. एखाद्या शासकीय कार्यक्रमात ‘वंदे मातरम्’ आणि राष्ट्रगीत दोन्ही असतील, तर आधी ‘वंदे मातरम्’ आणि त्यानंतर ‘जन गण मन’ सादर केले जावे.**



पण, या आदेशाला दक्षिणेतील राज्यांतून आव्हान दिले जात आहे. तामिळनाडूचे मुख्यमंत्री जोसेफ विजय यांनी शासकीय कार्यक्रमांत राज्यगीत आधी गायले जाणार, असा ठराव संमत केला आहे; तर केरळचे मुख्यमंत्री व्ही. डी. सतीशन यांच्या सरकारने आधी ‘वंदे मातरम्’ची सर्व कडवी गायली जाणार असा निर्णय जारी केला. पण, पक्षांतर्गत तसेच विरोधकांकडून वाढता विरोध पाहता केरळचे आरोग्य मंत्री के मुरलीधरन यांनी वेगळे विधान केले. केरळमध्ये राष्ट्रीय गीताची फक्त दोन कडवी गायली जाणार, असे त्यांनी स्पष्ट सांगितले.

केंद्रीय गृहमंत्रालयाने अलीकडेच राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांना जानेवारीतील राष्ट्रीय गीताच्या संदर्भातील निर्णयाचे पालन करावे लागेल, असे निर्देश दिले होते. या आदेशाला दक्षिणेतील राज्यांनी आव्हान दिल्याचे दिसत आहे, त्यामुळे पुन्हा केंद्र विरोधात दक्षिणी राज्य असा वाद रंगण्याची शक्यता आहे.

तमिळनाडूचे मुख्यमंत्री सी. जोसेफ विजय यांनी सोमवारी १० ऑगस्टला राज्याच्या विधानसभेत एक ठराव मांडला. या ठरावानुसार, शासकीय कार्यक्रमांच्या सुरुवातीला ‘तमिळ थाई वाझ्थू’ हे तमिळ मातेला समर्पित राज्यगीत गायले जाईल. १९७० पासून सुरू असलेली ही पद्धत कायम ठेवण्याची भूमिका या ठरावातून मांडण्यात आली आहे.

विधानसभेत बोलताना विजय यांनी नमूद केले, “तमिळ ही आमची भावना आणि ओळख आहे.” तमिळ भाषेकडे दुर्लक्ष करून किंवा तिचा अभिमान बाजूला ठेवून राज्याला पुढे जाता येणार नाही, अशी भूमिका त्यांनी मांडली. “आमची मातृभाषा आमच्या आई इतकीच पवित्र आहे,” असेही त्यांनी स्पष्ट केले; तर विजय यांनी तमिळ ही केवळ भाषा नसून आमच्यासाठी “संस्कृती, विचार आणि प्रेम” असल्याचेही म्हटले आहे.

तमिळनाडू विधानसभेतील या ठरावानुसार, सरकारी कार्यालये, शैक्षणिक संस्था, विद्यापीठे, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम आणि इतर सार्वजनिक संस्थांच्या कार्यक्रमांच्या सुरुवातीला ‘तमिळ थाई वाझ्थू’ गायले जाईल.

मात्र, ‘वंदे मातरम्’ची पूर्ण आवृत्ती गाण्याच्या निर्देशामुळे केरळमध्ये वादाला सुरुवात झाली. यूडीएफ आणि एलडीएफमधील पक्षांनी कॉंग्रेस सरकारवर आक्षेप घेतला. त्यांनी असा युक्तिवाद केला की, राष्ट्रीय गीताच्या पुढील काही कडव्यांमध्ये हिंदू देवतांचे संदर्भ येतात, त्यामुळे भारताच्या बहुविध आणि सर्वसमावेशक स्वरूपाशी ती कडवी सुसंगत नसल्याची त्यांची भूमिका आहे.

### केरळ सरकारचा निर्णय काय?

स्वातंत्र्यदिनाच्या काहीच दिवस आधी केरळ सरकारने ‘वंदे मातरम्’च्या गायनाबाबत शासन निर्णय जारी केला. केरळचे मुख्य सचिव भिश्वनाथ सिन्हा यांनी ६ ऑगस्ट रोजी जारी केलेल्या परिपत्रकात स्वातंत्र्यदिनाशी संबंधित कार्यक्रमांमध्ये ‘वंदे मातरम्’ “पूर्ण स्वरूपात” गायले जावे असे निर्देश दिले. मुख्य सचिवांनी जारी केलेला आदेश केंद्रीय संस्कृती मंत्रालयाच्या ‘हर घर तिरंगा’ अभियानाच्या मार्गदर्शक सूचनांवर आधारित होता. ९ ते १७ ऑगस्टदरम्यान देशभर होणाऱ्या या अभियानातील कार्यक्रमांमध्ये राष्ट्रध्वज फडकावताना किंवा प्रदर्शित करताना सामूहिकरित्या ‘वंदे मातरम्’ गायले जावे.

# गाझासाठीची डोनाल्ड ट्रम्प यांची १५ कलमी योजना इस्रायलने नाकारली

**महाईन्यूज । इराण**

**गाझातील युद्धविरामानंतर पुढे काय? हमासला निःशस्त्र करायचे, इस्रायली सैन्य मागे घ्यायचे आणि गाझाचे प्रशासन नव्याने उभे करायचे, अशी अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांची योजना आहे. मात्र, इस्रायलचे पंतप्रधान बिन्यामिन नेतान्याहू यांनी रविवारी ट्रम्प यांच्या या १५ कलमी रोडमॅपला विरोध केला आहे, त्यामुळे युद्धविरामानंतरची पुढची प्रक्रिया पुन्हा अडचणीत आली आहे.**



गेल्या महिन्याच्या अखेरीस डोनाल्ड ट्रम्प यांनी गाझातील युद्धविरामाच्या दिशेने मोठी प्रगती झाल्याचे जाहीर केले होते. हमास आणि इतर सशस्त्र गटांनी टप्प्याटप्प्याने राबवण्यात येणाऱ्या योजनेला सहमती दिल्याचे त्यांनी सांगितले होते. या योजनेनुसार, हमासने आणि इतर सशस्त्र गटांनी आपली शस्त्रे नव्या पॅलेस्टिनी प्रशासकीय संस्थेकडे सोपवायची होती. त्यानंतर हमासचे निःशस्त्रीकरण जसजसे पुढे जाईल, तसतसे इस्रायली सैन्याने गाझातून माघार घ्यायची होती.

मात्र, बिन्यामिन नेतान्याहू यांनी आता या प्रक्रियेच्या क्रमालाच विरोध केला आहे. रविवारी झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत नेतान्याहू यांनी “इस्रायल १५ कलमी दस्तऐवज नाकारत आहे,” असे स्पष्ट केले. हमासचे पूर्णपणे निःशस्त्रीकरण होईपर्यंत इस्रायली सैन्य गाझातून माघार घेणार नाही असेही त्यांनी सांगितले; तर इस्रायली सैन्य आपल्या सैनिक आणि नागरिकांसाठी असलेल्या धोक्यांचा सामना करत राहील अशी भूमिका त्यांनी घेतली.

नेतान्याहू आणि ट्रम्प यांच्या या मतभेदाचा परिणाम गाझातील पुढील शांतता प्रक्रियेवर होऊ शकतो. हमासचे निःशस्त्रीकरण आणि इस्रायली सैन्याची माघार याबरोबरच गाझामध्ये आंतरराष्ट्रीय सुरक्षा दल तैनात करणे, नवे पॅलेस्टिनी प्रशासन स्थापन करणे आणि गाझाची पुनर्बांधणी करणे या मुद्द्यांवरही त्याचा परिणाम होऊ शकतो. गाझाचे भविष्यातील राजकीय स्वरूप कसे असेल, याबाबतचे निर्णयही यामुळे लांबू शकतात.

डोनाल्ड ट्रम्प यांच्या म्हणण्यानुसार, हमास आणि इतर सशस्त्र गटांनी या टप्प्याटप्प्याच्या प्रक्रियेला सहमती दर्शवली होती. त्यानुसार, हमासचे निःशस्त्रीकरण पुढे जाईल तसतशी इस्रायली सैन्याची माघार सुरू होणार होती. मात्र, या प्रक्रियेत नेमके आधी काय होणार, यावरच आता इस्रायल आणि अमेरिकेत मतभेद निर्माण झाले आहेत. नेतान्याहू यांची भूमिका स्पष्ट आहे. हमासचे पूर्ण निःशस्त्रीकरण झाल्यानंतरच इस्रायली सैन्याने गाझातून माघार घ्यावी अशी त्यांची मागणी आहे. हमासकडील जड शस्त्रे, हलकी शस्त्रे आणि इतर सर्व शस्त्रे काढून घेणे आवश्यक असल्याची भूमिका नेतान्याहूंनी मांडली.

### ट्रम्प यांचा गाझासाठी १५ कलमी प्लॅन काय आहे?

३० जुलै रोजी अमेरिकेच्या नेतृत्वाखालील ‘बोर्ड ऑफ पीस’ने गाझासाठी १५ कलमी रोडमॅप मांडला. या योजनेत गाझाचे निःशस्त्रीकरण आणि पुनर्बांधणी टप्प्याटप्प्याने करण्याचा प्रस्ताव आहे. या योजनेनुसार, हमासने शस्त्रे सोपवली तर इस्रायली सैन्य गाझातून पूर्ण माघार घेईल. त्यानंतर गाझाचे प्रशासन स्वतंत्र पॅलेस्टिनी नॅशनल कमिटीकडे सोपवले जाणार आहे. या समितीला आंतरराष्ट्रीय सुरक्षा दलाचा पाठिंबा मिळणार आहे.

# घटस्फोटाच्या अफवांवर अमृता संतापली



अभिनेत्री अमृता खानविलकर तिचा पती अभिनेता हिमांशु मल्होत्रा वेगळे राहत असून ते लवकरच घटस्फोट घेणार असल्याच्या चर्चा मागील काही दिवसांपासून रंगल्या होत्या. याबाबतचे अनेक वृत्त, पोस्ट मोठ्या प्रमाणात व्हायरल झाले होते. मात्र वेगळे होण्याबाबत दोघांनीही कोणत्याही प्रकारे अधिकृत माहिती दिली नव्हती. त्यामुळे चाहत्यांचाही मोठा गोंधळ उडाला होता. परंतु अफवा उठल्यानंतर या सेलिब्रिटी कपलने कायदेशीर मार्ग अवलंबत थेट इशारा दिला आहे. अमृता खानविलकरच्या टीमनं अफवा पसरवणाऱ्यांविरोधात कठोर पावलं उचलली जाणार असल्याचा इशारा दिला आहे. अमृताने तिचा पती हिमांशु मल्होत्रासोबत तिच्या ऑफिशिअल इन्स्टा हँडलवरुन एक संयुक्त पोस्ट शेअर केली आहे. ही पोस्ट इंग्रजी आणि मराठी दोन्ही भाषेत आहे. अमृता खानविलकरनं पोस्टमध्ये म्हटले की, “अधिकृत कायदेशीर निवेदन 10 ऑगस्ट 2026 पासून लागू... काही ऑनलाइन, सोशल मीडिया आणि डिजिटल प्लॅटफॉर्मवर अमृता खानविलकर आणि त्यांच्या वैयक्तिक आयुष्याबद्दल चुकीचा, मानहानीकारक आणि गोपनीयतेचा भंग करणारा मजकूर पसरवला जात असल्याचं आमच्या निदर्शनास आलं आहे.” “अभिव्यक्ती स्वातंत्र्याचा गैरवापर करून बदनामी, अफवा किंवा खोटी माहिती प्रसारित केल्यास किंवा शेअर केल्यास, उपलब्ध पुराव्यांच्या आधारे संबंधित व्यक्ती किंवा संस्थेविरुद्ध कायदेशीर कारवाई करण्यात येईल. अशा सर्व प्रकारांवर लक्ष ठेवलं जात आहे, त्याआधारे योग्य कायदेशीर कारवाईसाठी त्याची नोंदही केली जात आहे, कायदेशीर टीम अमृता खानविलकर...”, असं अमृतानं पोस्टमध्ये म्हटले आहे. याद्वारे दोघांनी स्पष्टीकरण देत सोशल मीडियावरचे दावे खोटे असल्याचे स्पष्ट केले आहे. अमृता आणि हिमांशू हे २०१५ मध्ये विवाहबंधनात अडकले होते. सध्या वेगवेगळ्या घरांत राहत असले तरी ते अजूनही संपर्कात आहेत. करिअर प्राधान्ये, आर्थिक कारणे आणि आपापल्या कुटुंबांप्रती असलेल्या जबाबदाऱ्यांमुळे त्यांनी हा निर्णय घेतल्याचे एका सूत्राच्या हवाल्याने नमूद करण्यात आले होते.



# सेल्फीसाठी आली अन् अचानक केलं किस

बॉलिवूड अभिनेत्री निकिता रावल सध्या एका अनपेक्षित घटनेमुळे चर्चेत आली आहे. रेड कार्पेटवरील एका कार्यक्रमात फोटोग्राफर्ससमोर पोज देत असताना एका महिला चाहतीने निकितासोबत सेल्फी घेण्याची इच्छा व्यक्त केली. निकितानेही सहजपणे तिच्यासोबत पोज दिली. मात्र, सेल्फी सुरू असतानाच या चाहतीने अचानक निकिताच्या ओठांवर किस केल्याचे व्हिडिओमध्ये दिसत आहे. या अनपेक्षित प्रकारामुळे निकिता काही क्षणांसाठी आश्चर्यचकित झाल्याचे दिसते. या घटनेचा व्हिडिओ कार्यक्रमातील फोटोग्राफर्सच्या कॅमेऱ्यात कैद झाला आणि त्यानंतर सोशल मीडियावर मोठ्या प्रमाणात व्हायरल झाला. व्हिडिओ समोर आल्यानंतर नेटकऱ्यांमध्ये या घटनेची चर्चा सुरू झाली असून अनेकजण निकिता रावलविषयी माहिती शोधताना दिसत आहेत. व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर नेटकऱ्यांकडून प्रतिक्रिया पाहायला मिळत आहेत. काही जणांनी हा प्रकार अनपेक्षित आणि अस्वस्थ करणारा असल्याचे म्हटले आहे. निकिता रावल ही अभिनेत्री तसेच नृत्यांगना म्हणून ओळखली जाते. तिचा जन्म मुंबईत झाला असून तिने मिठीबाई कॉलेजमधून शिक्षण घेतले आहे.

# ‘वाराणसी’मध्ये महेश बाबूचा रुद्र अवतार! जंगलात दिसला दमदार लूक

एस. एस. राजामौली यांच्या बहुप्रतीक्षित ‘वाराणसी’ चित्रपटातील महेश बाबूंच्या ‘रुद्र’ भूमिकेचा दमदार लूक समोर आला आहे. आफ्रिकेच्या जंगलाच्या पार्श्वभूमीवर दिसणाऱ्या महेश बाबूंच्या या रुद्र अवताराने चाहत्यांची उत्सुकता आणखी वाढवली आहे. एस. एस. राजामौली यांच्या बहुप्रतीक्षित ‘वाराणसी’ या पॅन-इंडिया चित्रपटाची उत्सुकता दिवसेंदिवस वाढत आहे. महेश बाबू, प्रियांका चोप्रा आणि पृथ्वीराज सुकुमारन यांची प्रमुख भूमिका असलेला ॲक्शन-ॲडव्हेंचर चित्रपटातून महेश बाबूंचा ‘रुद्र’ या व्यक्तिरेखेतील पहिला लूक समोर आला आहे. महेश बाबू यांच्या वाढदिवसानिमित्त निर्मात्यांनी हा खास लूक फॅन्ससोबत शेअर केला. फोटो समोर येताच सोशल मीडियावर महेश बाबूंच्या नव्या अंदाजाची जोरदार चर्चा सुरू झाली आहे. ‘वाराणसी’ हा चित्रपट ७ एप्रिल, २०२७ रोजी जगभरात प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाला ऑस्कर विजेते संगीतकार एम. एम. कीरावानी यांचे संगीत लाभले आहे. कथा, भव्य लोकेशन्स आणि मोठ्या स्टारकास्टमुळे हा चित्रपट भारतीय सिनेमातील महत्त्वाकांक्षी प्रोजेक्टपैकी एक मानला जात आहे. चित्रपटाच्या अधिकृत सोशल मीडिया अकाउंटवर महेश बाबूंचे दोन फोटो शेअर करण्यात आले आहेत. या फोटोंमध्ये महेश बाबू दाढीच्या लूकमध्ये दिसत असून, त्यांचा पोशाखही अगदी साधा आणि आउटडोअर ॲडव्हेंचरला साजेसा आहे. एका फोटोमध्ये महेश बाबू आफ्रिकेतील निसर्गरम्य परिसरात उभा असल्याचे दिसतो. त्यामुळे हा फोटो एखाद्या मोठ्या ॲडव्हेंचर सिनेमातील दृश्य असल्याचे दिसते. दुसऱ्या फोटोमध्ये तो दाट हिरवाईने वेढलेल्या परिसरात बांबूच्या तराफ्यावर निवांत बसलेला दिसतो.





# मला नरेंद्र नावाचाच तिरस्कार वाटतो

## भारतीय बॉक्सरने पंतप्रधान मोदींसमोर सांगितला पाकिस्तानच्या खेळाडूचा किस्सा

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काल दिल्लीतील त्यांच्या '७ लोक कल्याण मार्ग' येथील निवासस्थानी, २०२६ च्या राष्ट्रकुल क्रीडा स्पर्धेत पदकं जिंकणाऱ्या भारतीय खेळाडूंशी संवाद साधला. यादरम्यान त्यांनी पदकविजेत्या खेळाडूंचं कौतुक केलं. शिवाय खेळाडूंशी संवादादरम्यान त्यांना काही प्रश्न विचारले. त्यापैकी भारताचा रौप्य पदक विजेता कुस्तीपटू नरेंद्र बेरवाल याने एक किस्सा सांगितला. ज्याने सर्वांचं लक्ष वेधून घेतलं.**






या संवादादरम्यान, पुरुषांच्या ९० किलोहून अधिक वजनी गटात रौप्ट पदक पटकावणाऱ्या बॉक्सर नरेंद्र बेरवालने एक मजेशीर किस्सा सांगितला, ज्यामुळे खुद्द पंतप्रधान मोदीही खळखळून हसले. बेरवालने सांगितलं की, सामन्यानंतर पाकिस्तानी बॉक्सरने त्याच्याशी संवाद साधला होता. त्यांनी तो प्रसंग इतक्या रंगतदार पद्धतीने सांगितला की उपस्थितांमध्ये हशा पिकला आणि स्वतः पंतप्रधान मोदीही हसू लागले.

बेरवाल याने २०१५च्या मिलिटरी गेम्समधील हा प्रसंग सांगितला. मिलिटरी गेम्समध्ये पहिल्याच फेरीत त्याचा सामना पाकिस्तानच्या बॉक्सरशी झाला होता आणि त्याआधी सैन्यातील सहकाऱ्यांकडून त्याला स्पष्ट संदेश मिळाला होता की हा सामना कोणत्याही परिस्थितीत गमावायचा नाही. तो म्हणाला, "माझा पहिल्या फेरीचा सामना पाकिस्तानविरुद्ध होता. मला सैन्याकडून फोन आला आणि सांगण्यात आलं की पाकिस्तानी खेळाडूकडून सामना गमावायचा नाही. मी तो सामना जिंकलो, पण दोघांनाही जखमा झाल्या. मी पहिला राऊंड ४-१ ने जिंकलो तर दुसरा राऊंड ३-२ने जिंकलो, पण सामन्यादरम्यान आमचं डोक एकमेकांवर आपटलं आणि टाके घालण्यासाठी रुग्णालयात जावं लागलं."

सामन्यानंतर दोन्ही बॉक्सर रुग्णालयात असताना एक मजेशीर योगायोग समोर आला. बेरवालने सांगितलं की त्या स्पर्धेत त्याचे आर्मी प्रशिक्षक यांचं नावही नरेंद्र होतं. तेव्हा पाकिस्तानी बॉक्सरने त्यांना हसत म्हणालं, "तुझं नाव नरेंद्र, तुझ्या कोचचं नाव नरेंद्र आणि तुमच्या पंतप्रधानांचं नावही नरेंद्र... मला 'नरेंद्र' नावाचाच तिरस्कार वाटायला लागला आहे!"

हा किस्सा सांगताना बेरवाल यांनी पाकिस्तानी बॉक्सरची ॲक्शन करत रंगवून सांगितला. ते ऐकून पंतप्रधान नरेंद्र मोदींसह उपस्थित सर्वजण मोठ्याने हसू लागले. हा प्रसंग ग्लासगो कॉमनवेल्थ गेम्समधील भारताच्या विक्रमी बॉक्सिंग मोहिमेच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात घडला. कॉमनवेल्थ स्पर्धेत भारतीय बॉक्सर पथकाने ७ सुवर्ण आणि ३ रौप्य अशी एकूण १० पदकं जिंकत ऐतिहासिक कामगिरी केली.

# सर्फराझ खानचं २ वर्षांनी भारतीय कसोटी संघात पुनरागमन!

**महाईन्यूज** । नवी दिल्ली

**श्रीलंकेविरुद्धच्या दोन सामन्यांच्या कसोटी मालिकेपूर्वी भारतीय क्रिकेट संघामध्ये मोठा बदल करण्यात आला आहे. टीम इंडियामधील खेळाडूंच्या दुखापतींचा मोठा फटका श्रीलंका मालिकेत संघाला बसला आहे. जसप्रीत बुमराहनंतर आता साई सुदर्शनदेखील दुखापतीमुळे मालिकेतून बाहेर पडला आहे. त्याच्या जागी आता सर्फराझ खानला संधी देण्यात आली आहे.**




२८ वर्षीय या आक्रमक फलंदाजाने जवळपास दोन वर्षांच्या कालावधीनंतर भारतीय कसोटी संघात पुन्हा स्थान मिळवलं आहे. मात्र, त्याच्या पुनरागमनामुळे एक महत्त्वाचा प्रश्न उपस्थित होत आहे, सर्फराझला लगेच कसोटी संघाच्या प्लेइंग इलेव्हनमध्ये लगेच संधी मिळेल का? सर्फराझने आतापर्यंत भारतासाठी सहा कसोटी सामने खेळले असून, ३७.१० च्या सरासरीने ३७१ धावा केल्या आहेत. त्याने आपल्या कसोटी कारकिर्दीची शानदार सुरुवात केली होती, परंतु सातत्यपूर्ण संधी न मिळाल्यामुळे तो हळूहळू संघातून बाहेर पडला.

सर्फराझने नोव्हेंबर २०२४ मध्ये न्यूझीलंडविरुद्धच्या मायदेशातील मालिकेत भारतासाठी आपला शेवटचा कसोटी सामना खेळला. त्या मालिकेत भारताला ०-३ अशा दारुण पराभवाचा सामना करावा लागला होता. न्यूझीलंडविरुद्धच्या तिसऱ्या कसोटीत सर्फराझला संधी मिळाली होती, परंतु त्याला दोन्ही डावांत कोणतीही महत्त्वपूर्ण खेळी करता आली नाही; पहिल्या डावात तो शून्यावर बाद झाला, तर दुसऱ्या डावात त्याला केवळ एकच धाव करता आली. त्यानंतर त्याला संघातून वगळण्यात आलं.

त्यानंतर, २०२४-२५ च्या बॉर्डर-गावस्कर ट्रॉफीसाठी भारताच्या १८ सदस्यीय संघात समावेश असूनही, सर्फराझला पाच सामन्यांच्या या मालिकेत एकही कसोटी सामना खेळण्याची संधी मिळाली नाही. ऑस्ट्रेलियाने ही मालिका ३-१ अशी जिंकली. ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर सर्फराझचे संघातील स्थान गेलं आणि बऱ्याच काळापर्यंत त्याच्याकडे दुर्लक्ष केलं गेलं. आता, साई सुदर्शनच्या दुखापतीमुळे त्याच्यासाठी भारतीय कसोटी संघाची दारं पुन्हा एकदा खुली झाली आहेत.

सर्फराझचे पुनरागमन हे केवळ दुखापतीमुळे बदली खेळाडू म्हणून नाही; तर त्याने देशांतर्गत क्रिकेटमधील आपल्या फलंदाजीने निवडकर्त्यांनाही प्रभावित केलं. २०२५-२६ च्या रणजी हंगामात, सर्फराझने मुंबईसाठी नऊ डावांत ४२९ धावा केल्या; यात त्याची फलंदाजीची सरासरी ५३.६२ होती आणि त्याची सर्वोच्च धावसंख्या २२७ इतकी होती.

### संधी का मिळणार नाही?

श्रीलंकेविरुद्धच्या कसोटी मालिकेत सर्फराझला संधी मिळते का, यावर सर्वांच्या नजरा असतील. साई सुदर्शनच्या अनुपस्थितीत देवदत्त पडिक्कल तिसऱ्या क्रमांकावर फलंदाजी करण्याची शक्यता आहे. सराव सामन्यात पडिक्कलने नाबाद १४२ धावांची खेळी करत संघाचा डाव सावरला. त्यामुळे सर्फराझने संघात पुनरागमन करूनही, प्लेईंग इलेव्हनमध्ये स्थान मिळवण्यासाठी सर्फराझला कदाचित वाट पाहावी लागेल. भारत आणि श्रीलंका यांच्यातील दोन सामन्यांची कसोटी मालिका १५ ऑगस्टपासून गॉल येथे सुरू होत आहे. भारतीय कसोटी संघात आपलं स्थान पुन्हा पक्कं करण्यासाठी ही मालिका सर्फराझसाठी एक महत्त्वाची संधी ठरू शकते.

स्मार्ट PCMC
SMART CITY
epaper.mahaenews.com
महाईन्यूज™
ePaper
। मंगळवार ।
दि. 11 ऑगस्ट 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

## हक्कांसाठी सात उपोषणे, न्यायालयीन लढे; आता संघर्ष अधिक तीव्र करण्याचा भोसले यांचा इशारा



# कंत्राटी कामगारांच्या अन्यायाविरोधात ‘क्रांती’चा हुंकार!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

**कामगारांच्या न्याय्य हक्कांसाठी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा संघर्ष यापुढेही अधिक तीव्रतेने सुरू ठेवण्याचा निर्धार कामगार नेते व संघटनेचे महाराष्ट्र राज्य अध्यक्ष यशवंत भोसले यांनी व्यक्त केला. ९ ऑगस्ट क्रांतिदिनाचे औचित्य साधून राष्ट्रीय श्रमिक आघाडीच्या वतीने संत तुकाराम नगर येथील जगद्गुरू संत तुकाराम महाराज सभामंडपात आयोजित क्रांतिदिन मेळाव्यात ते बोलत होते. या मेळाव्यास हजारो कामगार उपस्थित होते.**




९ ऑगस्ट १९४२ रोजी ब्रिटिशांना भारतातून हद्दपार करण्यासाठी ‘भारत छोडो’ आंदोलनाची सुरुवात झाली होती. याच ऐतिहासिक दिवसाचे औचित्य साधत कामगारांच्या प्रश्नांकडे सरकार, प्रशासन आणि न्यायव्यवस्थेचे लक्ष वेधण्यासाठी मेळाव्याचे आयोजन करण्यात आले.

भोसले म्हणाले की, ९ ऑगस्ट २०२२ रोजी कामगारांच्या संरक्षणाचे कायदे अधिक मजबूत करावेत आणि त्यांना घटनात्मक अधिकार मिळावेत, या मागणीसाठी पुणे येथील कामगार कार्यालयासमोर प्राणांतिक उपोषण करण्यात आले होते. तब्बल १३ दिवस हे उपोषण सुरू होते. गेल्या अनेक वर्षांपासून विविध माध्यमांतून कामगारांच्या हक्कांसाठी सातत्याने संघर्ष सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

कारखाने, आस्थापना, शासकीय, निमशासकीय तसेच स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये कायमस्वरूपी कामगारांच्या जागी मोठ्या प्रमाणावर कंत्राटी कामगारांची नियुक्ती केली जात आहे. कंत्राटी कामगारांना किमान वेतन दिले जात असल्याचे कागदोपत्री चित्र असले, तरी अनेक ठिकाणी त्यांना कायदेशीर वेतन, विविध सवलती, सुरक्षेची साधने आणि साप्ताहिक सुट्टी यांसारखे मूलभूत अधिकार प्रत्यक्षात मिळत नसल्याचा आरोप भोसले यांनी केला.

कामगारांच्या हक्कांसाठी गेल्या २६ वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालयात दाद मागत असल्याचेही त्यांनी सांगितले. न्यायालयीन प्रक्रियेला वर्षानुवर्षे लागणारा वेळ आणि कामगारांना न्यायासाठी कराव्या लागणाऱ्या फेऱ्यांबाबत त्यांनी खंत व्यक्त केली.

“संविधानाने कामगारांना दिलेले अधिकार प्रत्यक्षात मिळवून देण्यासाठी गेल्या तीन दशकांत अनेक मोर्चे, रस्त्यावरची आंदोलने आणि सात वेळा उपोषणे केली. मात्र, कायमस्वरूपी कामगारांची संख्या कमी होत असताना कंत्राटदार आणि कंत्राटी कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे,” असे भोसले यांनी सांगितले.

### चाकण-तळेगावची वाहतूक होणार सुसाट!

कामगारांच्या हक्कांसाठी गेल्या २६ वर्षांपासून मुंबई उच्च न्यायालय, सर्वोच्च न्यायालय, कामगार न्यायालय आणि औद्योगिक न्यायालयात दाद मागत असल्याचे भोसले यांनी सांगितले. मात्र, न्यायालयीन प्रक्रियेत वर्षानुवर्षे वेळ जात असून कामगारांना न्याय मिळण्यासाठी सातत्याने न्यायालयीन फेऱ्या माराव्या लागत असल्याची खंत त्यांनी व्यक्त केली. “संविधानाने कामगारांना दिलेले अधिकार प्रत्यक्षात मिळवून देण्यासाठी गेल्या तीन दशकांत अनेक मोर्चे, रस्त्यावरची आंदोलने आणि सात वेळा उपोषणे केली. मात्र, कायमस्वरूपी कामगारांची संख्या कमी होत असताना कंत्राटदार आणि कंत्राटी कामगारांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे,” असेही त्यांनी स्पष्ट केले.

### राष्ट्रीय श्रमिक आघाडी, कामगारांच्या न्याय हक्कासाठी..!

कामगारांना न्याय मिळवून देण्यासाठी संविधान, न्यायव्यवस्था आणि सरकारवर आपला पूर्ण विश्वास आहे, असे सांगत भोसले यांनी सरकारने श्रमिक, शेतकरी आणि कामगारांच्या हितासाठी कठोर आणि ठोस पावले उचलावीत, अशी अपेक्षा व्यक्त केली. कामगारांच्या हक्कांसाठी राष्ट्रीय श्रमिक आघाडीचा संघर्ष यापुढेही अविरत सुरू राहील, अशी ग्वाही त्यांनी क्रांती दिनाच्या मेळाव्यात उपस्थित हजारो कामगारांना दिली.

### ‘सामान काम, सामान वेतन’ अधिकाराची पायमल्ली..

“कायमस्वरूपी कामगाराला ज्या कामासाठी सुमारे ४८ हजार रुपये मासिक वेतन मिळते, त्याच स्वरूपाचे काम करणाऱ्या कंत्राटी कामगाराला केवळ १५ ते १८ हजार रुपये दिले जातात. तेही महिन्याचे ३० दिवस काम केल्यानंतर,” हा कामगार बांधवांवरील अत्याचार आहे. अशी खंत यशवंत भोसले यांनी व्यक्त केली. समान कामासाठी समान वेतनाचा अधिकार कायद्यामध्ये असतानाही प्रत्यक्षात कामगारांना त्याचा लाभ मिळत नसल्याचे त्यांनी नमूद केले.

# पिंपरी-चिंचवड DP वर हरकतींचा बागुलबुवा..

## ११५९ पैकी १७ आरक्षणांवर सर्वाधिक आक्षेप; ४० लाख लोकसंख्येच्या शहरात ३७ हजार हरकती

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**पिंपरी-चिंचवड शहराचा विकास आराखडा (डीपी) हा आगामी अनेक दशकांच्या शहर विकासाची दिशा निश्चित करणारा महत्त्वाचा दस्तऐवज आहे. या आराखड्यावर नागरिकांकडून एकूण ३७ हजार ४७९ हरकती नोंदवण्यात आल्या आहेत. शहराची लोकसंख्या सुमारे ४० लाख आहे, तर हरकतींचे हे प्रमाण एकूण लोकसंख्येच्या तुलनेत एक टक्क्यापेक्षाही कमी—सुमारे ०.९४ टक्के इतके आहे. त्यामुळे हरकतींची संख्या मोठी दिसत असली, तरी तिचा लोकसंख्येच्या तुलनेत विचार केला तर वेगळे चित्र समोर येते.**



विशेष म्हणजे, उपलब्ध आकडेवारीनुसार, प्रारुप विकास आराखड्यातील १७ प्रमुख आरक्षणांवर एकूण ३७ हजार ४७९ हरकती नोंदवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये सर्वाधिक हरकती या रस्ते, सार्वजनिक सुविधा आणि विशिष्ट आरक्षणांशी संबंधित आहेत. त्यामुळे संपूर्ण विकास आराखडाच जनविरोधी असल्याचे चित्र निर्माण करण्यापेक्षा नेमक्या कोणत्या आरक्षणांवर, कोणत्या कारणांसाठी आणि किती हरकती आल्या आहेत, याचा वस्तुनिष्ठ विचार करणे गरजेचे ठरते.

ग.दि. माडगुळकर नाट्यगृहात हरकती- सूचनांवर सुनावणी दि. ३ ऑगस्ट २०२६ रोजी सुरू झाली आहे. मात्र, या सुनावणीला अत्यल्प प्रतिसाद मिळत आहे. डीपी वरील हरकतींसाठी प्रत्येक हरकतदाराला नोटीस पाठवून सुनावणीला निमंत्रित करण्यात आले आहे. त्यासाठी प्रशासनाला प्रत्येक नोटीस करीता खर्च करावा लागला आहे. तसेच, क्यु-आर कोड स्कॅन करुन हरकतीची पारदर्शकता कायम ठेवण्यात आली. यावर त्रांतिक यंत्रणा उभारण्यासाठी प्रशासनाला खर्च करावा लागला. हा सर्व पैसा सर्वसामान्य पिंपरी-चिंचवडकरांच्या कररुपी पैशातून खर्च झाला आहे.

प्रारुप डीपी प्रसिद्ध झाला. त्यावेळी महापालिका निवडणुकीची रणधुमाळी सुरू होती. त्या डीपीचे निमित्त करुन प्रचंड राजकीय संभ्रम निर्माण करण्यात आला. हरकती आणि सूचना, आक्षेपांचा बागुलबुवा करण्यात आला. मात्र, आता सुनावणी सुरू झाल्यानंतर या बागुलबुवाचा बुरखा फाटला आहे.

### राजकीय विरोधापेक्षा शहरहिताचा विचार हवा!

विकास आराखडा हा कोणत्याही एका पक्षाचा, नेत्याचा किंवा सरकारचा विषय नाही. तो पिंपरी-चिंचवडच्या पुढील पिढ्यांच्या भविष्याशी जोडलेला विषय आहे. त्यामुळे आरक्षणांबाबत वस्तुनिष्ठ आक्षेप असतील, तर ते सुनावणीसमोर ठोस कारणांसह मांडणे अपेक्षित आहे. मात्र केवळ राजकीय हेतूने विकास आराखड्याला सरसकट विरोध करणे, प्रत्येक आरक्षणाला 'अन्याय' ठरवणे किंवा नागरिकांमध्ये गैरसमज निर्माण करणे, हे शहराच्या दीर्घकालीन हिताचे ठरणार नाही. ४० लाखांच्या शहराला पुढील २०-३० वर्षांचा विचार करून रस्ते, वाहतूक, आरोग्य, शिक्षण, क्रीडा, सार्वजनिक सुविधा आणि पर्यावरणासाठी जागा राखून ठेवावीच लागणार आहे.

### हरकतींचा विषय महत्त्वाचा; 'डीपीविरोध' हा निष्कर्ष घाईचा

विकास आराखड्यावर हरकती नोंदवण्याचा नागरिकांना पूर्ण अधिकार आहे. एखाद्या आरक्षणामुळे जमीनमालक, रहिवासी किंवा स्थानिक नागरिकांच्या हितावर परिणाम होत असेल, तर त्यावर प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. मात्र काही विशिष्ट आरक्षणांवर मोठ्या प्रमाणात हरकती आल्या म्हणून संपूर्ण डीपीच जनविरोधी आहे, असा निष्कर्ष काढणे योग्य ठरणार नाही. उलट, हरकतींच्या स्वरूपाचा अभ्यास केला असता शहरासाठी आवश्यक असलेल्या रस्ते, सार्वजनिक सुविधा, क्रीडा, वाहतूक, सामाजिक पायाभूत सुविधा आणि भविष्यातील विकासासाठी राखीव जागांबाबत नागरिकांच्या वेगवेगळ्या भूमिका समोर येत आहेत. याचा अर्थ डीपीमध्ये शहराच्या विविध गरजांचा विचार करण्यात आला आहे, असेही म्हणता येते.

### 'हरकत' म्हणजे 'आरक्षण रद्द' नव्हे!

३७ हजार ४७९ हरकती नोंदवल्या गेल्या आहेत, ही बाब लोकशाही प्रक्रियेच्या दृष्टीने महत्त्वाची आहे. मात्र प्रत्येक हरकत ग्राह्य धरलीच जाईल, असे नाही. हरकतींची छाननी, सुनावणी आणि तज्ज्ञांच्या अभिप्रायानंतरच आरक्षणांबाबत अंतिम निर्णय होणार आहे. त्यामुळे सध्या गरज आहे ती राजकीय आरोप-प्रत्यारोपांची नव्हे, तर हरकतींच्या गुणवत्तापूर्ण छाननीची. जेथे नागरिकांचे रास्त नुकसान होत असेल तेथे सुधारणा व्हावी आणि जेथे शहराच्या भविष्यासाठी आरक्षण आवश्यक आहे तेथे ते कायम राहावे, हीच संतुलित भूमिका ठरू शकते. ३७ हजार ४७९ हरकतींच्या आकड्यापेक्षा त्यामागील कारणे महत्त्वाची आहेत. आणि ४० लाखांच्या शहराच्या भविष्यासमोर केवळ राजकीय विरोध नव्हे, तर दीर्घकालीन विकासाचा व्यापक दृष्टिकोन ठेवणे ही शहराची खरी गरज आहे, असे निरीक्षण नगर रचना क्षेत्रातील तज्ज्ञांनी नोंदवले आहे.

## 'पार्किंग पॉलिसी' आणि हॉकर्स धोरणाच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी झोनची पाहणी सुरू

महाईन्यूज । पिंपरी- चिंचवड

**शहराच्या वाढत्या नागरीकरणासोबतच वाहतूक व्यवस्था सुरळीत राखणे आणि पदपथ अतिक्रमणमुक्त करणे यावर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेने विशेष भर दिला आहे. याच पार्श्वभूमीवर शहरात 'पार्किंग पॉलिसी' आणि 'हॉकर्स धोरण' प्रभावीपणे राबविण्याच्या हालचालींना प्रत्यक्ष गती मिळाली असून, स्थायी समितीचे सभापती अभिषेक बारणे यांच्या मार्गदर्शनाखाली व पुढाकाराने महापालिकेच्या 'ग' क्षेत्रीय कार्यालय अंतर्गत विविध भागांचे प्रत्यक्ष पाहणी दौरे सुरू करण्यात आले आहेत.**



शहरात दिवसेंदिवस वाढणारी वाहनसंख्या आणि त्यामुळे होणारी वाहतूक कोंडी यावर कायमस्वरूपी मात करणे, नागरिकांना चालण्यासाठी सुरक्षित व मोकळे पादचारी मार्ग उपलब्ध करून देणे तसेच फेरीवाल्यांसाठी हॉकर्स झोनची निश्चिती करून त्यांचे योग्य पुनर्वसन करणे, हा या धोरणाचा मुख्य उद्देश आहे. या महत्त्वाकांक्षी धोरणाची अंमलबजावणी कागदावरच न राहता प्रत्यक्षात जमीन स्तरावर कशी राबविता येईल, यासाठी प्रशासकीय यंत्रणा सक्रिय झाली आहे.

या धोरणाच्या अंमलबजावणीचा एक भाग म्हणून 'ग' क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील अत्यंत वर्दळीच्या समजल्या जाणाऱ्या काळेवाडी फाटा चौक, बी.आर.टी. मार्ग तसेच थेरगाव परिसरातील विविध भागांची प्रत्यक्ष पाहणी करण्यात आली. या पाहणीदरम्यान स्थानिक परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. भविष्यात वाहनचालक, व्यावसायिक आणि पादचाऱ्यांना कोणतीही गैरसोय होणार नाही, याद्दष्टीने योग्य जागांची निश्चिती करण्याबाबत व वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी आवश्यक त्या उपाययोजना राबविण्याबाबत यावेळी सविस्तर चर्चा करण्यात आली.

या पाहणी व आढावा दौऱ्यावेळी 'ग' क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त मुकेश कोळप, स्वीकृत नगरसेवक संदीपभाऊ गाडे तसेच महापालिकेचे संबंधित विभागप्रमुख व अधिकारी वर्ग उपस्थित होता. शहराचे नियोजनबद्ध, सुव्यवस्थित आणि शिस्तबद्ध रस्ते हेच शहर विकासाचे खरे प्रतीक असते, असे मत अभिषेक बारणे यांनी यावेळी व्यक्त केले. प्रशासनाकडून राबविण्यात येत असलेल्या या लोकहिताच्या मोहिमेला पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिकांचे आणि व्यावसायिकांचे पूर्ण सहकार्य लाभेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

# मोशी दुर्घटनेतील मृतांच्या कुटुंबांना 'मदतीचा हात'

## नगरसेविका सारिका गायकवाड यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला यश

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**मोशी कचरा डेपो दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना मोठा दिलासा मिळाला आहे. संबंधित कंपनीकडून प्रत्येक मृत कर्मचाऱ्याच्या कुटुंबीयांना ४० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याची घोषणा करण्यात आली आहे. तसेच मृत कर्मचाऱ्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी, कुटुंबातील पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विम्याचे संरक्षण देण्याचा निर्णयही कंपनीने घेतला आहे. मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना न्याय मिळावा, यासाठी नगरसेविका सारिका गायकवाड यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याला या निर्णयामुळे यश मिळाले आहे.**



मोशी येथील कचरा डेपो परिसरात ८ जुलै रोजी कचऱ्याचा मोठा ढिगारा वेस्ट-टू-एनर्जी प्रकल्पाच्या प्रशासकीय इमारतीवर कोसळून भीषण दुर्घटना घडली होती. या दुर्घटनेत ९ कर्मचाऱ्यांचा मृत्यू, तर १४ जण जखमी झाले होते. ढिगाऱ्याखाली अडकलेल्या नागरिकांचा शोध घेण्यासाठी बचाव पथकांनी तब्बल ८४ तास अथक प्रयत्न केले.

दुर्घटनेनंतर मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांवर मोठे संकट कोसळले. कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावल्याने त्यांच्या उदरनिर्वाहाचा, मुलांच्या शिक्षणाचा आणि भविष्यातील सुरक्षिततेचा प्रश्न निर्माण झाला होता. या पार्श्वभूमीवर सारिका गायकवाड यांनी कंपनी प्रशासनाकडे ठोस आर्थिक मदतीसह मृतांच्या कुटुंबीयांच्या दीर्घकालीन पुनर्वसनाची मागणी लावून धरली.

मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना केवळ एकरकमी आर्थिक मदत देऊन प्रश्न सुटणार नाही, तर त्यांच्या मुलांचे शिक्षण, कुटुंबातील एका व्यक्तीला रोजगार आणि आरोग्याची सुरक्षा मिळणे आवश्यक आहे, अशी भूमिका सारिका गायकवाड यांनी मांडली होती. त्यानुसार कंपनीकडून आता ४० लाखांची मदत, पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी, पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विमा देण्याची घोषणा करण्यात आली आहे. या निर्णयामुळे दुर्घटनेत कुटुंबातील आधार गमावलेल्या नागरिकांना मोठा आधार मिळणार आहे. विशेषतः मृत कर्मचाऱ्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा खर्च आणि भविष्यातील रोजगाराची तरतूद झाल्याने कुटुंबांवरील मानसिक व आर्थिक ताण काही प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा आहे.

> मोशी दुर्घटनेत कुटुंबातील कर्ता व्यक्ती गमावलेल्या कुटुंबीयांच्या वेदना शब्दांत मांडता येणार नाहीत. त्यामुळे केवळ आर्थिक मदत देऊन आमची जबाबदारी संपत नाही, तर या कुटुंबांच्या भवितव्याचीही काळजी घेणे गरजेचे आहे. मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांना ४० लाख रुपयांची मदत, त्यांच्या पाल्यांच्या शिक्षणाची जबाबदारी, पात्र व्यक्तीला नोकरी आणि आरोग्य विम्याचे संरक्षण मिळावे, यासाठी आम्ही सातत्याने पाठपुरावा केला. या मागणीला सकारात्मक प्रतिसाद मिळाल्याचे समाधान आहे. आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढेही या कुटुंबांना आवश्यक ती मदत आणि न्याय मिळवून देण्यासाठी आम्ही ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहू.
>
> **- सारिका गायकवाड, नगरसेविका, भाजपा.**

### पत्रकार परिषदेत निर्णयाची माहिती

या संदर्भात आयोजित पत्रकार परिषदेत सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, 'क' क्षेत्रीय कार्यालयाचे प्रभाग अध्यक्ष निखिल बोऱ्हाडे, नगरसेविका सारिका गायकवाड, कंपनीचे एचआर प्रतिनिधी तसेच दुर्घटनेत मृत्यू झालेल्या कर्मचाऱ्यांचे नातेवाईक उपस्थित होते. भाजपा नेते तथा आमदार महेश लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली सारिका गायकवाड यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे कंपनीला मृत कर्मचाऱ्यांच्या कुटुंबीयांच्या भवितव्याबाबत ठोस निर्णय घेण्यास भाग पाडण्यात यश आले, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

### महापालिकेचीही १० लाखांची मदत

दुर्घटनेनंतर पिंपरी-चिंचवड महापालिकेने मृत कर्मचाऱ्यांच्या वारसांना प्रत्येकी १० लाख रुपयांची आर्थिक मदत देण्याचा निर्णय घेतला होता. त्यानंतर कंपनीकडूनही भरीव मदत मिळावी, यासाठी पाठपुरावा करण्यात आला. आता कंपनीकडून जाहीर झालेल्या ४० लाख रुपयांच्या मदतीमुळे प्रत्येक कुटुंबाला मोठा आर्थिक आधार मिळणार आहे. त्यासोबतच शिक्षण, रोजगार आणि आरोग्य विम्याच्या सुविधेमुळे मदतीला व्यापक स्वरूप प्राप्त झाले आहे.

# RTO प्रशासनासोबत यशस्वी बैठक; १५ ऑगस्टपर्यंत आंदोलन स्थगित

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**'टू-व्हीलर टॅक्सी'ला तीव्र विरोध, 'पिंक रिक्षा' योजनेतील कथित भ्रष्टाचाराची चौकशी तसेच रिक्षा, टॅक्सी व कॅब चालक-मालकांच्या विविध प्रलंबित मागण्यांसाठी महाराष्ट्र रिक्षा पंचायत आणि विविध रिक्षा संघटनांनी सोमवारी (दि. १०) पुणे व पिंपरी-चिंचवड प्रादेशिक परिवहन कार्यालयावर पुकारलेले आंदोलन अखेर चर्चेनंतर तात्पुरते स्थगित करण्यात आले. आरटीओ प्रशासनासोबत तब्बल दोन तासांहून अधिक काळ झालेल्या बैठकीत प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याबाबत प्रशासनाने सकारात्मक भूमिका घेतली. मात्र, १५ ऑगस्टपर्यंत मागण्यांची पूर्तता न झाल्यास पुन्हा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा महाराष्ट्र रिक्षा पंचायतीने दिला आहे.**




महाराष्ट्र रिक्षा पंचायतचे संस्थापक अध्यक्ष तथा कष्टकरी रिक्षाचालकांचे नेते डॉ. बाबा कांबळे यांच्या नेतृत्वाखाली शिष्टमंडळाने आरटीओ प्रशासनासमोर विविध मागण्या मांडल्या. आंदोलनाची तीव्रता लक्षात घेता पिंपरी-चिंचवडच्या उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अश्विनी स्वामी यांनी शिष्टमंडळाला चर्चेसाठी आमंत्रित केले. त्यानंतर झालेल्या बैठकीत रिक्षाचालकांच्या प्रश्नांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीमध्ये आरटीओ कार्यालयाच्या स्तरावर प्रलंबित असलेल्या प्रश्नांवर प्रशासनाकडून सकारात्मक प्रतिसाद देण्यात आला. संबंधित प्रश्नांचा आढावा घेऊन ते लवकरात लवकर निकाली काढण्याचे आश्वासन अधिकाऱ्यांनी दिले. त्यामुळे आंदोलनकर्त्यांनी तूर्तास आंदोलन स्थगित करण्याचा निर्णय घेतला.

'टू-व्हीलर टॅक्सी'ला परवानगी, 'पिंक रिक्षा' योजनेतील टेंडर प्रक्रिया तसेच ॲग्रीगेटर पॉलिसीसारखे प्रश्न हे केवळ आरटीओ स्तरावर सोडविणे शक्य नसल्याने ते तातडीने वरिष्ठ अधिकारी आणि राज्य शासनाच्या पातळीवर पाठविण्याबाबत बैठकीत चर्चा झाली. या मागण्यांबाबत शासनाकडे योग्य तो प्रस्ताव पाठविण्याची भूमिका प्रशासनाने घेतल्याचे संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी सांगितले.

बैठकीतील चर्चेनंतर महाराष्ट्र रिक्षा पंचायतीने आंदोलनाला १५ ऑगस्टपर्यंत मुदत दिली आहे. या कालावधीत चर्चेतील मागण्यांवर ठोस कार्यवाही झाली नाही, तर १५ ऑगस्टनंतर पुन्हा अधिक तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा स्पष्ट इशारा संघटनेच्या वतीने देण्यात आला.

### अधिकारी, पदाधिकाऱ्यांची उपस्थिती


बैठकीस उपप्रादेशिक परिवहन अधिकारी अश्विनी स्वामी, मोटार वाहन निरीक्षक अमोल मालठाणे, कसबे, अभिजीत तरकसे, प्रशासकीय अधिकारी मनोज बागमार, कर्मचारी अमोल सदरे, विवेक भास्कर यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

# भारताचा स्वाभिमान तिरंग्याच्या सन्मानासाठी भव्य 'तिरंगा यात्रा'

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**भारतीय तिरंगा आणि देशाच्या सीमेवर मातृभूमीच्या रक्षणासाठी अहोरात्र लढणाऱ्या शूर जवानांच्या सन्मानार्थ पुण्यात मंगळवारी (११ ऑगस्ट) भव्य 'तिरंगा यात्रा' आयोजित करण्यात आली आहे. या यात्रेत राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह विविध क्षेत्रांतील मान्यवर सहभागी होणार आहेत. राष्ट्रभक्त नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन भारतीय जवानांप्रती एकजूट आणि कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन पिंपरी चिंचवडकर राष्ट्रभक्त नागरिक संघटनांनी केले आहे.**




मंगळवारी दुपारी २.३० वाजता पुणे कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, गणेशखिंड रोड येथे पिंपरी-चिंचवडमधील नागरिकांसाठी एकत्र येण्याची व्यवस्था करण्यात आली आहे. येथून नागरिक तिरंगा यात्रेत सहभागी होणार आहेत. फर्ग्युसन कॉलेज रोड ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौक, डेक्कन असा यात्रेचा मार्ग असणार आहे.

देशाच्या सीमेवर प्रतिकूल परिस्थितीत कर्तव्य बजावणाऱ्या भारतीय जवानांच्या शौर्याला सलाम करण्यासाठी तसेच देशाची एकता, अखंडता आणि सामर्थ्याचा संदेश देण्यासाठी ही तिरंगा यात्रा आयोजित करण्यात आली आहे. हातात तिरंगा घेऊन मोठ्या संख्येने नागरिक सहभागी झाल्यास राष्ट्रभक्तीचा जागर आणि जवानांप्रती असलेला सन्मान अधिक प्रभावीपणे व्यक्त होईल, असा विश्वास आयोजकांनी व्यक्त केला.

पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील राष्ट्रभक्त नागरिकांनी कुटुंबीय, मित्रपरिवार आणि कार्यकर्त्यांसह मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन पिंपरी चिंचवड शहरातील राष्ट्रभक्त नागरिकांकडून करण्यात येत आहे. तिरंगा यात्रेत सहभागी होण्यासाठी पिंपरी-चिंचवडमधून जाणाऱ्या नागरिकांसाठी विशेष नियोजन करण्यात आले आहे. पुणे कृषी महाविद्यालय, शिवाजीनगर, गणेशखिंड रोड, पुणे येथे नागरिकांसाठी एकत्र येण्याची तसेच पार्किंगची व्यवस्था करण्यात आली आहे. मंगळवारी दुपारी २.३० वाजता नागरिकांनी या ठिकाणी उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे. पिंपरी-चिंचवडमधील विविध भागांतून नागरिक, कार्यकर्ते आणि राष्ट्रभक्त पुण्याकडे रवाना होणार असून, कृषी महाविद्यालय परिसरातून यात्रेत सहभागी होण्याचे नियोजन करण्यात आले आहे. त्यामुळे नागरिकांनी वेळेत उपस्थित राहून नियोजनाला सहकार्य करावे, असे आयोजकांकडून सांगण्यात आले आहे.

'तिरंगा हातात घेऊया... राष्ट्रभक्तीची ताकद दाखवूया!' या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या यात्रेत नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन देशाच्या वीर जवानांप्रती कृतज्ञता व्यक्त करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

### फर्ग्युसन कॉलेज रोड ते संभाजी महाराज चौक

भव्य तिरंगा यात्रेचा मार्ग फर्ग्युसन कॉलेज रोड ते धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज पुतळा चौक, डेक्कन असा असणार आहे. हातात तिरंगा घेऊन सहभागी होणारे नागरिक या मार्गावरून राष्ट्रभक्तीचा संदेश देणार आहेत. यात्रेदरम्यान भारतमातेचा जयघोष, तिरंग्याचा सन्मान आणि जवानांच्या शौर्याला सलाम या भावनेतून वातावरण भारावून जाण्याची शक्यता आहे. देशाच्या कानाकोपऱ्यातील नागरिकांना एकत्र बांधणाऱ्या तिरंग्याच्या माध्यमातून राष्ट्रीय एकात्मता, देशप्रेम आणि सामाजिक एकजुटीचा संदेश देण्याचा उद्देश या यात्रेमागे आहे. त्यामुळे कोणताही राजकीय भेद न ठेवता राष्ट्रहिताच्या भावनेतून नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

# संत साई इंग्लिश मिडीयम हायस्कूल भोसरी येथे क्रांती दिन जल्लोषात साजरा

**महाईन्यूज | पिंपरी- चिंचवड**

**संत साई इंग्लिश मीडियम हायस्कूल भोसरी, आदिनाथ नगर या ठिकाणी ९ ऑगस्ट क्रांती दिन मोठ्या जल्लोषात संपन्न झाला. प्राथमिक स्वरूपात प्रमुख पाहुणे व संस्थेचे विश्वस्त ओम प्रकाश सर (रिटायर्ड लेफ्टनंट COL.), अंकुश गोरडे (अध्यक्ष – नारायण हट स्कूल, इंद्रायणी नगर, संदिप मुंगसे (अध्यक्ष – UK गुरुकुल इंग्लिश मीडियम स्कूल, आळंदी )तसेच पालक शिक्षक संघांचे प्रतिनिधी यांनी भारत मातेच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्रतापूर्वक वंदन केले व मशाल प्रज्वलित करून क्रांती दिनाची सुरुवात केली.**




शाळेच्या स्थापनेपासूनच प्रत्येक वर्षी क्रांती दिनाचे औचित्य साधून वेगवेगळ्या सामाजिक उपक्रमाद्वारे "क्रांती सप्ताह "या ठिकाणी उत्साहात संपन्न केला जातो. याही वर्षी "क्रांती फॉर नेशन बिल्डिंग" हा क्रांतिकारी विचार घेऊन शाळा प्रशासन क्रांती सप्ताह साजरा करणार आहे.

आजच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजना सिंग मॅडम यांनी केले. शाळेत क्रांती सप्ताहा निमित्त रोज वेगवेगळे विषय घेऊन समाज प्रबोधन करण्यात येणार आहे. क्रांती सप्ताहा निमित्त प्रथम दिनी प्रबोधनपर विषय क्रांती अगेन्स्ट लेझीनेस हा होता.

९ ऑगस्ट – क्रांती दिवस चा विषय होता क्रांती अगेन्स्ट लेझीनेस. आळस हा मानवाचा शत्रू आहे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. विभावरी सुतार व कु. आरोही शिंदे तसेच आभारप्रदर्शन कु. चिरायू वाबळे याने केले.

कु. अनन्या राऊत (इ. 9वी) हिने या वर्षी ची थिम "क्रांती फॉर नेशन बिल्डिंग" ची माहिती दिली. कु. ज्ञानेश्वरी सांगळे (इ. 9वी) हिने भाषण केले, कु. अन्वी बाबर (इ. 7वी) हिने कथा सांगितली तसेच कु. अवनी हांडे (इ. 9 वी) हिने कविता सादर केली. इ. 8 वी च्या विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या नुक्कड नाटकाने सर्वांना मोहित केले.

शाळेचे संस्थापक शिवलिंग ढवळेश्वर सर यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. ओमप्रकाश सर यांनी विद्यार्थ्यां यांनी मुलांना आळस झटकून व्यायाम, भरपूर अभ्यास करण्याचा सल्लाह दिला.

मनशक्तीच्या मूलभूत तत्त्वांना अनुसरून शाळेतील विद्यार्थ्यांना ज्ञानदाना बरोबर संस्कारही दिला जातो असेही सरांनी सांगितले. अंकुश गोरडे यांनी भारतीय स्वातंत्र्यलढ्यात सहभागी झालेल्या क्रांतीकारकांची यथोचित माहिती विद्यार्थ्यांना दिली. संदिप मुंगसे यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

"भारत माता की जय," "वंदे मातरम". "इन्कलाब जिंदाबाद" च्या घोषणांनी आणि ढोल ताशाच्या गजरात शाळेचा परिसर दुमदुमून गेला. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी माध्यमिक विभागाच्या प्रमुख सौ. रूपाली खोल्लम, सहशिक्षिका सौ. मालन लिंगाडे ,सौ. श्वेता नारायणगावकर, सौ. रिया पोतदार, श्री.मनोज वाबळे सर , श्री.संजय अनर्थे, श्री. अक्षय राणे सर, श्री.प्रमोद शिंदे सर, शिक्षक पालक संघ प्रतिनिधी सौ.दीपिका ननावरे , सौ. सुनिता केरकर, सौ. अरुणा कुंभार, सौ. पूजा शिंदे, सौ. प्रगती भोयर, सौ. रुपाली शिंदे हे कार्यक्रमाला उपस्थित होते. देशाला स्वातंत्र्य मिळावे म्हणून आपल्या प्राणांचे बलिदान देणाऱ्या हुतात्म्यांना विनम्रतापूर्वक अभिवादन करून क्रांती दिनाची सांगता झाली.

### पुढील दिवसांचे विषय पुढीलप्रमाणे

10 तारखेला – क्रांती अगेन्स्ट मोबाईल अडिक्शन (ADDICTION)
11 तारखेला – क्रांती अगेन्स्ट एक्स्कुसेस (EXCUSES)
12 तारखेला – क्रांती अगेन्स्ट वेस्ट (WASTE)
13 तारखेला – क्रांती अगेन्स्ट नेगेटिव्हिटी (NEGATIVITY)
14 तारखेला – क्रांती अगेन्स्ट डिसरेस्पेक्ट (DISRESPECT) असे कार्यक्रमाचे आयोजन आहे.

DTE Code 6310

Approved by AICTE | Accredited by NAAC | Accredited by NBA

PCET- NUTAN

# Nutan Maharashtra Institute of Engineering and Technology

Autonomous Institute | SPPU Affiliated

## Admissions Open for Academic Year 2026–27

| Degree | Programme Name | Choice Code | Intake |
|---|---|---|---|
| B.Tech | Computer Engineering (CE) | 631024510 | 240 |
| B.Tech | Computer Science Engineering (CSE) | 631024210 | 180 |
| B.Tech | Artificial Intelligence & Data Science (AI&DS) | 631099510 | 120 |
| B.Tech | Information Techanology (IT) | 631024610 | 120 |
| B.Tech | CSE Artificial Intelligence (CSE AI) | 631091310 | 60 |
| B.Tech | Electronics and Telecommunication (E&TC) | 631037210 | 120 |
| B.Tech | Mechanical Engineering | 631061210 | 120 |
| B.Tech | Electronics & Computer Engineering | 631084410 | 120 |
| M.Tech | Computer Engineering (CE) | 0631024510 | 12 |
| M.Tech | E&TC (IoT & Sensor System) | 0631095210 | 12 |
| BCA | Bachelor of Computer Applications (BCA) | 0631010110 | 120 |
| MBA | Master of Business Administration (MBA) | 0631010110 | 120 |
| MCA | Master in Computer Application (MCA) | 0631010110 | 120 |
| LL.B. | Bachelor of Laws | 26031 | 60 |
| B.Sc | Cyber and Digital Science (B.Sc) | - | 60 |
| B.Voc. | Bachelor of Vocation (B.Voc.) | - | 180 |



Highest Package for PCET-Nutan
**61 Lakh P.A.**

Average Salary Package
**5.5 Lakh P.A.**

For Admissions Contact:
**8830992988 / 7423080910 / 9028101155**




Scan the QR Code Today to Get More Information

Samarth Vidya Sankul, Vishnupuri, Talegaon Dabhade, Pune – 410507